# प्रकरण दुसरे

## पाध्ये यांच्या कथांची आशयसूत्रे

## प्रकरण दुसरे

## पाध्ये यांच्या कथांची आशयसूत्रे

### प्रास्ताविक:

भाऊ पाध्ये यांच्या आजवर प्रसिध्द झालेल्या कथासंग्रहातून आपल्याला त्यांच्या ३८ कथा एकत्रित वाचावयास मिळतात. भाऊ पाध्ये यांच्या लेखनाचे विश्व मुंबई ही महानगरी आहे. या शहरात, शहराभोवती त्यांच्या सर्वच्या सर्व कथा घडतात. संख्यात्मक दृष्टया पाध्यांच्या कथा अधिक नाहीत हे जरी खरे असले तरी गुणात्मदृष्टया त्या चांगल्या प्रतीच्या आहेत, हे निश्चित. त्यांच्या एकूण ३८ कथांपैकी तीन-चार कथांचा अपवाद वगळता त्यांची प्रत्येक कथा वैशिष्टयपूर्ण आणि त्यांच्या लेखक म्हणून भूमिकेचा वेगवेगळा पैलू दाखवणारी आहे.

पाध्यांची लेखक म्हणून असणारी वैशिष्टयपूर्णता लक्षात येण्यासाठी त्यांच्या कथांच्या आशयसूत्राचा अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून या प्रकरणात आपण त्यांच्या कथांच्या आशयसूत्रांचा विचार करणार आहोत. भाऊ पाध्ये हे स्वतंत्र जाणीव आणि भूमिका असणारे लेखक आहेत. त्यांचे लेखन गंभीरता प्राप्त वैचारिक बैठकीवर आधारलेले आहे असे जाणवते. त्यांचा जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोण स्वतंत्र आहे. रूढ सांकेतिकतेच्या चष्म्यातून ते जीवनाकडे पहात नाहीत. मुंबई महानगरीत घडणारी त्यांची कथा जीवनाची व्यापक क्षेत्रे आशयासाठी निवडते. त्यामुळे त्यांच्या कथा सकृतदर्शनी इतर कथाकारांच्यापेक्षा वेगळ्या व कलात्मकदृष्टया चांगल्या वाटतात.

भाऊ पाध्ये हे व्यापक सहानुभाव असणारे मानवतावादी लेखक आहेत. कारण त्यांच्या प्रत्येक कथेतून व्यापक सहानुभावाचे व मानवतावादाचे अनोखे

दर्शन जाणवते. त्यांच्या विशाल निरीक्षण शक्तीचा प्रत्यय त्यांच्या कथांमधून येतो. त्यामुळे स्त्री-पुरुष संबंधाकडे-ही ते निर्मळ आणि नैसर्गिक दृष्टीने पहातात. त्यामुळे त्यांच्या कथांना सांकेतिकतेच्या मर्यादा पडत नाहीत. मराठी कथेत अद्यापपर्यंत न आलेले स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण पाध्यांच्या कथेत येते असेही जाणवते.

पाध्ये यांचे जीवन-व्यवहाराचे आकलन हे ही वेगळे आणि वैशिष्टय-पूर्ण असे आहे. माणसाची "माणूस" म्हणून असणारी प्रतिष्ठा त्यांना महत्त्वाची वाटते. ती जपण्याचा ते आपल्या लेखनातून प्रयत्न करतात. भाषा आणि बोली या बाबतचे जाणीवपूर्वक प्रयोग ते आपल्या कथांतून करीत असल्याचे जाणवते.

प्रथमदर्शनी जाणवणाऱ्या पाध्यांच्या या लेखन वैशिष्टयांचा सखोल वेध घेण्यासाठी त्यांच्या कथांच्या आशयसूत्रांचा विचार आपण या प्रकरणात करणार आहोत.

पाध्ये यांच्या सर्व कथा मुंबई या महानगरीत घडतात. या महानगरीय जीवनात अस्वस्थ करणारी हिंसा आहे. धापापलेलं शहरी जीवन आहे. शेजारधर्म, मत्सर, दुस्वास आहे. या बरोबरच जीवनाचे विविध स्तर, त्या स्तरातील वेगवेगळी अस्वस्थता, जगण्याचे स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. हा सारा पट पाध्यांच्या कथांतून आलेला दिसतो.
या ठिकाणी त्यांच्या कथांची विविधांगी व्याप्ती लक्षात घेऊन आशयसूत्रांचा विचार करण्यासाठी त्यांच्या कथांचे वर्गीकरण केलेले आहे. हे वर्गीकरण विवेचनाच्या सोयीसाठी केलेले असले तरी वैशिष्टये लक्षात घेता ज्या कथा समानधर्मी जाणवल्या त्या एका गटात समाविष्ट केलेल्या आहेत.

पाध्ये यांच्या बहुतेक कथांतून स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण येते. पण पाध्यांचा स्त्रीकडे पहाण्याचा स्वतंत्र दृष्टिकोण आहे. त्यामुळे त्यांच्या स्त्रीविश्वाचा स्वतंत्र भूमिकेतून विचार मांडणाऱ्या कथांचा पहिला गट केलेला असून विवेचनाच्या सोयीसाठी उपगट कल्पिलेले आहेत.

पाध्ये यांच्या कथेत मुंबईच्या जीवनाचे विविध स्तर येतात. त्यांच्या कामगार-विषयक कथांचा स्वतंत्र गट केलेला आहे. तर उच्चवर्गीय जीवन-चित्रण असणाऱ्या कथांचा विचार स्वतंत्र केलेला आहे. राजकारणाकडे पहाण्याची त्यांची उपहासगर्भ स्वतंत्र दृष्टी आहे. त्यामुळे अशा कथांचे वर्गीकरण स्वतंत्र गटात केलेले आहे. ज्या कथांचा विचार एखाद्या गटात समाविष्ट करून करता येणे अशक्य आहे अशा कथांचा विचार स्वतंत्र केलेला आहे.

## स्त्री-पुरुष संबंध चित्रित करणाऱ्या कथा:

मुंबईतील जीवन विविध गुंतागुंतींनी व्यापलेले आहे. मुंबईत माणसे जशी जगतात तशीच सर्व वैशिष्ट्यांनिशी भाऊ पाध्ये यांच्या कथेत येतात. त्यासाठी त्यांना कृत्रिमतेचा आसरा घ्यावा लागत नाही.

पाध्ये स्त्री-पुरुष संबंधातील वेगवेगळे पैलू सहजतेने आपल्या कथांतून चित्रित करतात. या संबंधातील विविध ताणतणावांचे बारकाव्यांसहित वर्णन ते आपल्या कथांतून समर्थपणे करतात.

स्त्री-पुरुष संबंध मग तो विवाहितांचा असो किंवा अन्य प्रकारचा, तो नीटसपणे समजावून घेऊन तो निसर्ग-धर्म स्वच्छ आणि निर्लेप पध्दतीने साहित्यात आणण्याचा प्रयत्न फारच कमी लेखकांनी केलेला आहे. अर्थात

9610
A

असे लेखन करताना लागणारी कमालीची भावनिक तटस्थता असल्याशिवाय ते साधणे शक्य नाही. ही तटस्थता भाऊ पाध्ये यांच्या कथांतून किंवा एकूणच लेखनातून आढळते. डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात —
"विशाल आशय जिद्दीने, निर्व्याजपणे, कुठेही दांडी न मारता मांडणारे भाऊ पाध्ये.... खुल्या संरचना मांडून, नाना त-हेचे वास्तव आशय निवडून अभिरूचीचा नवा प्रान्त निर्माण करतात."[१]
भाऊ पाध्ये स्त्री-पुरूष संबंधाकडे व्यक्ती-व्यवहाराचा भोग म्हणून पाहतात. वास्तव तपशीलांसह चित्रित करतात. याचा प्रत्यय त्यांच्या विविध कथांतून येतो. पाध्ये यांच्या कथांतून स्त्री-पुरूष संबंधाचे विविध थर आपल्याला दिसतात. मुंबई शहरात वावरणा-या विविध प्रकृतींच्या आणि विकृतीच्या माणसांचे स्त्री-पुरूष संबंध त्यांच्या कथांतून येतात.

साधारणत: हिंदू संस्कृतीत स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान आहे. वस्तू हेच तिचे मूल्य मानलेले दिसते. या रूढ नैतिक कल्पनेनुसार योनि-शुचितेची कल्पना केंद्रभागी मानण्यात आलेली आहे. संपूर्ण भारतीय समाज प्राचीन काळापासून स्त्रीला शुचितेच्या कल्पनेनुसार तोलत आलेला आहे. यातूनच स्त्री जमातीवर विविध स्वरूपाचे अन्याय झालेले दिसतात. या अन्यायाचे स्वरूप इतके जटिल आणि भयावह आहे की स्त्रीला वस्तुमूल्य तरी आहे का ? असा प्रश्न पडावा.

भाऊ पाध्ये यांच्या कथांतून हा स्त्री-जमातीवर झालेला अन्याय वास्तवपणे चित्रित केल्याचे जाणवते. मुळात पाध्ये हे समाजवादी विचार-सरणी स्वीकारलेले लेखक असल्यामुळे ते या गोष्टीचा विचार अधिक आ आत्मीयतेने करतात. पण त्यात ही स्त्री म्हणजे अन्याय सहन करणारे आगार असा भावनात्मक आक्रोश करण्याचाही त्यांचा लेखनाचा धर्म नाही. "आहे हे असे आहे" इतक्या सहजपणे या विश्वाचे ते दर्शन घडवितात. वाचकाला विचारप्रवण करतात.

मुंबई सारख्या महानगरीत विश्वभराचे अनुभव माणसाला घ्यावे लागतात. या महानगरीत स्त्री जीवनाचे विविध नमुने, त्यांच्या समस्या, होणारे अन्याय या सर्वांचेच चित्रण पाध्ये आपल्या कथेतून करतात. पाध्ये यांच्या "स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण करणा-या कथांची" आशयसूत्रे विचारासाठी घेत असताना त्यांच्या कथांचे खालील गट केलेले आहेत.

१) सरळ स्वभावी स्त्रीत्व जपणा-या स्त्रियांच्या कौटुंबिक कथा.

२) विशिष्ट मानसिक जडण-घडणीतील स्त्री-पुरुष संबंधाच्या कथा.

३) उच्चवर्गीय स्त्री-पुरुष संबंधाच्या कथा.

४) विकृत पुरुष-स्त्री संबंधाच्या कथा

५) नपुसक पतीप्राप्त स्त्रीच्या वैवाहिक जीवनाच्या कथा

६) विवाहबाह्य स्त्री-पुरुष संबंधाच्या कथा.

या प्रत्येक गटातील प्रत्येक कथा ही स्वतंत्र आहे. तिची वैशिष्टये ही स्वतंत्र आहेत. अशा कथांच्या आशयसूत्रांचा सविस्तर विचार या ठिकाणी आपण करु.

## सरळ स्वभावी स्त्रीत्व जपणा-या स्त्रियांच्या कौटुंबिक कथा:

पाध्ये यांची कथा पती-पत्नी नात्यातील सूक्ष्म ताण-तणावांसहित वेगवेगळे पैलू वाचकांच्या समोर ठेवते. यामुळे पाध्यांची कथा मराठी कथा-वाङ्मयात वेगळी ठरते. पाध्ये पती-पत्नी संबंधाचे चित्रण तटस्थपणे करतात. त्यामुळे वर्ण्यविषयात वाचकाला वास्तवता अनुभवयास मिळते.

त्यांच्या "ठेच" कथेतील अनुसयाबाई सरळपणे जगत असताना समाज तिला

छिनाल म्हणत असतो. पण ती सरळ स्वभावी स्त्री नव-याबरोबर प्रामाणिकपणे रहात असते. अपत्याची वाणवा हे तिचे व्यक्तिगत दुःख असते. शिरडीत एका अभावित क्षणी आप्पाशी संग करते. नंतर तिला त्यात रस वाटत नाही. त्याला ती टाळते. जगण्याचा नित्यक्रम पूर्ववत सहजपणे सुरु करते.

पाध्ये यांच्या कथेतील ही एक उत्तम दर्जाची कथा. कथेचा ऐवज तसा थोडकाच आहे पण कथा विलक्षण परिणामकारक होते.

कथेचा निवेदक मी-म्हणजे आप्पा जोरदार पावसामुळे अनुसयाबाईच्या बंद दारासमोर आडोशाला उभा रहातो. दार बंद म्हंटल्यावर आत एखादे गि-हाईक असावे. असा विचार करत तो उभा असताना नानीभाई हा तिचा नवरा ओंगळ आणि लाचार दिसणारा, कोठूनतरी आला. आप्पाला आत या म्हणत बंद दार उघडून आत गेला. काही वेळाने अनुसयाबाईना पहाण्याची आप्पाची जिज्ञासा तीव्र होते. तो आत जातो. तिचे सौंदर्य पाहून खुष होतो. तिच्याच घरची छत्री घेऊन रस्ता कातरतो. छत्रीच्या माध्यमातून त्या घरात ये-जा वाढवतो. इतकी की त्या घरचाच होतो. "बाई चांगली होती. आपण तिच्यावर खुष होतो आणि संधीची वाट पहात होतो" ही स्पष्ट कबुली देऊन टाकतो. नंतर बोलता बोलता तिच्या तोंडून "नव-याला ठेच लागलीय" असा उल्लेख येतो. आप्पाला चैनच पडत नाही. त्याला दोन गोष्टींचा शोध घ्यावयाचा असतो - एक ठेच आणि ही बाई खरोखरच चालू आहे का ? बाई चालू नसल्याची खात्री त्याला लगेचच पटते. पण हे ठेच प्रकरण त्याच्या हाताशी येईना. एकदा सिनेमाच्या निमित्ताने शोध लागला. नानीभाईला मूल होत नाही ही ठेच होती पण तो खरोखर नामर्द आहे का? याचा शोध लागल्यानंतर त्याची लाईन क्लीअर होणार होती. नंतर एकदा या जोडीने आप्पाला आपल्याबरोबर शिरडीला नेले. तिथं

नानीभाईने आप्पासोबत बेवडा मारला. पण तो इतका प्याला की औट झाला. सकाळी पूजेला अनुसयाबाई ... आप्पाला बरोबर घेऊन गेली. आरती चालू असताना घुमू लागली. आप्पाची पंचायत आली पण लोक जेव्हा "तुमची बायको" असा अनुसयेबद्दलचा उल्लेख करतात तेव्हा तो तिला उचलून हॉटेलवर आणून झोपवतो. नानीभाई पुन्हा बेवडा ठोकायला गेलेला. हा तिला वारं घालू लागतो. तेव्हा त्या तंद्रीत त्याला मिठी मारते. हा जागृत होऊन तिला चिकटतो. सहजपणे.

अनुसयाबाई आता आपली झाली असे वाटून तो परत मुंबईत आल्यानंतर पुन्हा पुन्हा प्रयत्न करु लागतो. शिरडीची आठवण देतो पण ती तेथे काही घडले हे मानायलाच तयार होत नाही. त्याला झिडकारते. त्याचं घरी जाणं बंद होतं. नानीभाई एक दिवशी याला आपल्या घरी पाळणा हलणार. साई कृपा असे सांगतो आणि आप्पालाही ठेच लागते.

मानवी स्वभावाच्या अनेक गुंतागुंती पाध्ये यांनी या कथेत चित्रित केलेल्या आहेत. या कथेतील अनुसया शिरडीला काहीच घडले नाही असे वागते कारण तिथं जे काही घडलं ते फक्त रस्त्यात लागणा-या ठेचेसारखं मानून ती आपला कोणताच जीवनक्रम बदलत नाही. इतक्या सहजपणे तिने ते घेतलेले आहे. या कथेतील तीनही पात्रांना वेगवेगळया प्रकारची "ठेच" लागलेली आहे. अनुसया चालू बाई समजून लगट करणा-या रसिक आप्पाला लागलेली ठेच, देव न मानणा-या नानीभाईला साईबाबाची कृपा झाली ही ठेच आणि अनुसयाबाईची अपत्यप्राप्ती ही ठेच. या तीनही स्वभावातून समाजाच्या वेगवेगळया समाजमनांचा पडताळा पाध्ये देतात.

एखाद्या स्त्री अकारण दोषी ठरवून समाज तिला बदनाम ठरवत असतो पण ती मात्र वाटयाला आलेलं आयुष्य प्रमाणिकपणे जगण्याचा प्रयत्न

करत असते. यात ती कुठेच समाजासाठी, समाजप्रतिष्ठा जपण्यासाठी न जाता ती तिच्या सहजच्छेनुसार जगते. त्यात तिला पाप वाटत नाही. पण तिने आखून घेतलेल्या मर्यादा ही तो सोडत नाही.

पाध्ये ही कथा अत्यंत संयमित शब्दांनी हकिकतीच्या स्वरूपात वाचकासमोर ठेवतात व मानवी स्वभावाचे विविध पैलू दाखवतात.

<u>संकेत मिलनाचा</u> - या कथेत दिनू या मुंबई शहरातल्या ऑफिस कारकूनाच्या वेणू या पत्नीची पत्नी म्हणून जगण्याची चाललेली धडपड पाध्ये शब्दांकित करतात. मुळात पसंत नसलेली वेणू पत्नी झाल्यानंतर दिनू तिला आपल्या आयुष्यातून वजा करून जगत असताना एके दिवशी तिच्यात गुंतून जातो. फक्त तिच्या प्रमाणिक जगण्यामुळं॰एवढा ऐवज असणारी ही कथा.

निवेदक मी - म्हणजे दिनू आपल्या बायकोची आणि प्रियेची कथा सांगतो. दिनूला त्याची बायको आवडत नाही. ही गोष्ट त्याने कुणा-पासूनही, म्हणजे तिच्यापासूनही लपवलेली नाही आणि बायकोनेही "मग का केलंत लग्न ? हा प्रश्न विचारलेला नाही. इतक्या सहजपणे दोघांनी ही गोष्ट स्वीकारलेली आहे. लग्नापूर्वी दिनूने हा स्पष्ट खुलासा आपल्या बायकोसमोर केलेला असतो. तरीही त्यांचे लग्न होते. तिला लग्न हा एक सोपस्कार आटोपून जावा इतकंच वाटत असतं. ती जगू लागते. दिनूकडून कोणतीच अपेक्षा न करता यंत्रावत थंडपणानं ती जगत असते.
दिनूला फक्त तिचे केस आवडलेले असतात. त्याने जगत असताना आपले लग्न झाले आहे हे विसरण्याची सवय लावून घेतलेली असते. कारण त्याच्या ऑफिसमधील रोझमेरीवर त्याचे प्रेम असते. त्याच्या डोक्यात सतत रोझमेरी असल्याने आपले लग्न झाले आहे, असे तो कोणालाही सांगत नाही.

त्याची पत्नी विनातक्रार जगत असताना अचानक "मॉड" बनण्याचा प्रयत्न करु लागते. त्याला हा बदल जाणवतो पण त्याला त्याच्याशी ही काही कर्तव्य नसतं.

पाध्ये हे चित्रण करत असताना आपल्यासमोर संस्कृती म्हणून चाललेले, कोणतीच भावनिक गुंतागुंत नसलेले लाखो संसार भारतात आणि भारतातच कसे चालतात याचे सुंदर चित्र उभा करतात. हा निवेदक दिनू आणि त्याची पत्नी वेणू दोन वेगवेगळ्या जमावाचे प्रतिनिधी आहेत. तरीही त्यांचा संसार चालू रहातो. पण एके दिवशी त्याला विचित्र स्वप्न पडतं. स्वप्नात पत्नीने केस कापले आहेत असं वाटून दचकून जागा होतो. पत्नीच्या केसावरुन हात फिरवू लागतो. ती जागी होते. त्याला तिचे केस आवडलेले आहेत. हेत्याचे गुपीत आहे. हे तो पत्नीला सांगत नाही.

तिचा पाय सँडल घातल्यामुळे मुरगळतो. तरी तो कोणतीच प्रति-क्रिया व्यक्त करत नाही. याबाबत तो म्हणता - "तिच्या मनात माझ्या विषयी काही ही आशा निर्माण झाली असेल तर ती पुसून टाकली पाहिजे"[२] एवढं अलिप्तपणे तो तिच्याशी वागत असतो.

पाध्ये काही संसार हे फक्त "चालत" असतात. यंत्रावत चालत असतात. हे कोठेही प्रतिक्रिया व्यक्त न करता दाखवतात.

दिनू आणि वेणू यांच्या चाललेल्या संसारात वेणू बदलते आहे असे वाटून गतिमानता येते. पण त्यात ही व्यवहारी भूमिका असते. पण एके दिवशी वेणू केस कापण्यासाठी ब्युटी पार्लरमध्ये गेल्याची बातमी ऑफिसचा शिपाई आणतो. तेव्हा हादरलेला दिनू रोझमेरीबरोबर ब्युटीपार्लरमध्ये हजर होतो आणि रोझमेरीची वेणूशी ओळख करुन देतो. एवढे रामायण फक्त तो तिच्या आवडलेल्या केसांसाठी करतो. आपल्या बायकोनं रोझमेरीसारखं केस कापून घेणं त्याला पसंत नाही.

रोझमेरी "मॉड" आहे. मॉड मुलगी मैत्रिण म्हणून ठीक आहे पण बायको म्हणून आपली गावंढळ वेणूच योग्य आहे हे त्याचे अंतरिक तत्त्व आहे.

पाध्ये या दोघांच्यातील तणाव दाखवता दाखवता आपल्याकडील पुरुषकेंद्री स्वभावरचनेचा एक पैलूही या कथेच्या माध्यमातून वाचकासमोर ठेवतात.

स्त्री-पुरुष संबंधाबरोबरच त्यांच्या कौटुंबिक विश्वावर पाध्ये "साप" या कथेतून प्रकाश टाकतात. कोणत्याही स्त्रीला "सवत" हा विषय न मानवणारा. पण एखादी स्त्री मानसिकदृष्टया या विषयातील मत्सराच्या पलिकडे पोहचली असेल तर शेजार-पाजारी तिच्यातील सवतीमत्सर नाग सापासारखा कसा जीवन्त करतात व एका स्त्रीचीच ठेचल्या सापासारखी कशी अवस्था करतात याचे वर्णन पाध्ये "साप" या कथेत करतात.

या कथेची निवेदिका-मावशी व नाना ही दोघेही नोकरी करणारी. त्यामुळे त्यांच्या घराला घरपण असे नसतेच. अजागळ शांततेत त्यांचा संसार चाललेला असतो. अशातच सुनंदा ही मावशीची भाची त्यांच्याकडे परीक्षेसाठी येते आणि घरातला अजागळपणा जाऊन घराचे घरपण आकाराला येते. या काळातच नाना महिन्याची रजा टाकतात.

या काळात नाना आणि सुनंदाचे सूत जमते. पण मावशीला हे अतिविश्वासाने खरे वाटत नाही. तेव्हा चाळीतील सर्वमंडळी मावशीच्या संसाराची काळजी वाटून त्यांना विविध प्रसंग सांगून सावध करण्याचा प्रयत्नाला लागतात. या सगळयात मावशीची कोंडी सुरु होते. एकीकडून सुनंदाचा स्वभाव, वागणं तिला आत्यंतिक आवडत असते. त्यामुळे सुनंदा असं काही करत असेल किंवा करत असलीच तरी आपण तिच्यावर रागवावं असं मावशीला वाटत नसतं. आप्पा असे वागतील हे ही तिला पटत नसतं.

शेवटी शेजा-यांच्या प्रयत्नाने मावशीच्या मनातला संशयी साप वळवळतो. सुनंदा झाल्या प्रकाराची कबूली देऊन बॅग घेऊन घरातून बाहेर पडते. तेव्हा सगळी चाळ सापाला ठेचून मारावे तशी तिच्याकडे पहात असते.

या ठिकाणी पाध्ये शेजारधर्म, दुस्वास आणि दुस-याच्या संसाराविषयीची उत्सुकता हे मानवी सहजभाव आपल्या कथेत समर्थपणे दाखवतात.
चाळ-संस्कृतीत या विषयांना असणारे महत्त्व, दुस-याच्या संसाराविषयी वाटणारी अकारण काळजी, संशय या सा-यामुळे होणारी मानसिक उलाढालीची शृंखला पाध्ये या कथेत चित्रित करतात.
स्त्रीची मानसिक घडण, तिचा मत्सर, संशय, अहंम्, उत्सुकता या सा-याचेच वर्णन पाध्ये सुनंदा - मावशी - चाळीतील बायका यांच्या माध्यमातून कलात्मक पध्दतीने दाखवतात.
मुळात "साप" हे कथेचे शीर्षकच पाध्ये इतक्या समर्पक पध्दतीने वापरतात की मानवी मनातला साप वाचकांना अस्वस्थ करतो.

सारांश:

पाध्ये आपल्या कथांतून सरळ स्वभावी स्त्रीत्व जपणा-या स्त्रियांचे भावविश्व आपल्या कथांतून सरळ, वास्तवपूर्णरीत्या उभे करतात. कधी कधी यासाठी सांकेतिकतेचा ही वापर करतात.
मानवी कौटुंबिक विश्व ही विविध बारकाव्यानिशी व तपशीलांसह कथेत रंगवतात.
मराठीतील इतर कथांपेक्षा ह्या कथा म्हणूनच वेगळ्या व अधिक वास्तव वाटतात.

विशिष्ट मानसिक जडण-घडणीतील स्त्री-पुरुष संबंधाच्या कथा:

मुंबई शहरात महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरची अनेक माणसे पोटापाण्यासाठी किंवा महत्त्वाकांक्षेपायी येत असतात. या विविध भूप्रदेशातून आलेल्या माणसांची मानसिक जडण-घडण ही तिथल्या वातावरणाने, संस्काराने, संस्कृतीने आकारत गेलेली असणे स्वाभाविक. अशी वेगवेगळ्या मानसिक जडण-घडणीतील माणसे मुंबईत आल्यानंतर त त्यांचे वर्तन हा ही एक कथा चित्रणाचा विषय आहे. हे पाध्यांची कथा दर्शविते.

काही वेळा प्रादेशिक संस्कृतीच्या आणि समाजव्यवस्थेच्या भूमीमधून पाळामुळासकट उखडलेले लोक जेव्हा एखादया महानगराच्या मर्यादित अव-काशात येतात तेव्हा त्यांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडून येतात. महा-नगरवासीयांच्या पिढयांचे वेगवेगळे थर आपल्याला चाळींच्या, मोहल्ल्यांच्या, लोकवस्त्यांच्या, झोपडपट्टयांच्या स्पानं स्पष्ट दिसतात. महानगरात लोकसंख्येचे घर्षण अटळ असते. पण त्यातले संघर्ष टाळायला तसेच मुळची सामाजिक आणि सांस्कृतिक आत्मप्रतिमा शक्यतितकी टिकवण्याकरता लोक प्रयत्नशील असतात. अशा लोकांचे जीवन मराठी कथावाड्.मयात आलेले नाही. याचे कारण लेखकाचे अनुभवविश्व हे ही असू शकेल. या विचित्र कोंडी झालेल्या विश्वात सामान्य आवाका असणाऱ्या लेखकाच्या चिमटीत न सापडणारे ताण-तणाव असतात. हे ताण-तणाव या माणसांविषयी-च्या पराकोटीच्या आत्मीयतेशिवाय शब्दबध्द करता येणे अशक्य आहे.

भाऊ पाध्ये यांनी "पायातला बूट", "बायका खाणारी माणसं", "पोल्ट्री फार्मिंग", "बगीचा" या कथांमधून विशिष्ट मानसिक जडण-घडणीतील महानगरवासीयांच्या कौटुंबिक विश्वातील ताण-तणाव चित्रित केले आहेत.

अशा वस्तीतील जनजीवन हे अनेक समस्यांनी भरलेले आहे. येथे स्त्रीवर होणारा अन्याय पारंपारिक पुरूषी मनोवृत्तीचे प्रतीक आहे. या अन्यायाचे चित्रण ही पाध्ये आपल्या कथांतून करतात.

बायको म्हणजे पायातील बूट हे संस्कार आई, बहिणी यांच्याकडून झालेल्या बाबूची मनोधर्म प्रकट करणारी कथा म्हणजे "पायातील बूट" होय.

मुळात ही कथा आहे बाबूच्या पुरूषी अहंकाराखाली चिरडलेल्या सुरेखाची. आपल्याला कोणी का असेना पसंत करावे असे तिला वाटत असते. मुंबईचा कामगार बाबू तिला पसंत करतो. लग्न ही मुलीच्या आयुष्यातील आनंदाची गोष्ट. पण सुरेखाला त्याचं काहीही वाटत नाही. "लग्न म्हणजे एक मरण संपलं" ही तिची भावना.
पहिल्याच रात्री जवळ झोपायला आलेला बाबू अंथरूणाजवळ बूट घेऊन येतो कारण बायको म्हणजे पायातला बूट हे त्याचे जगण्यातले तत्वज्ञान आहे. सुरेखा नव-याचे सगळे किळसवाणे प्रकार, सासूचे बोलणे, नणंदांचा द्वेष सहन करते. तिला कशानेच अस्वस्थता येत नाही. इतकी ती थंड असते. ती नव-याबरोबर मुंबईला येते. इथल्या वातावरणात रूळते. बदलते. नव-याची यथासांग सेवा करते. इथे ती सुखी असते. कमतरता तिला फक्त मूल होत नाही याची असते. हे सुख तिच्या नशीबी नसते.
खेड्यात मूल न होणे याला स्त्रीच जबाबदार हा समज घट्ट रूजलेला. त्यामुळे बाबूच्या दुस-या लग्नाची तयारी घराकडे सुरु होते.
यातच बाबू मुंबईतल्या मित्रांचा सल्ला मानून आपली व सुरेखाची डॉक्टर तपासणी करवून घेतो. दोष बाबूतच निघतो. त्याला काही सुचत नाही. अशात गावाकडून मुलगी बघून ठेवल्याचं पत्र येतं. आणि सुरेखाची अस्वस्थता शिगेला पोहचते. ती बाबूला म्हणते" आम्ही बायका तुमच्या पायातले बूट!"[3] बाबू पुन्हा अधिक अस्वस्थ होतो. गावाकडून त्याची

बहिण येणार म्हंटल्यावर तो तिच्या आग्रहाला बळी पडेल अशी शक्यता सुरेखाला वाटत असते. पण बाबू महागाईचा विचार करुन दुसऱ्या लग्नाचा विचार डोक्यातून काढून टाकतो. बहिणीला आल्या पावली परत पाठवतो. तेव्हा घरातमहजब उठतो. आपला मुलगा बायकोचा "बैल" झाला. याचं त्यांना वाईट वाटत असतं. त्यावेळी बाबूचा भाऊ आईला सांगतो -- "आई, बाबू आपला राहयला नाही... पण मी तुला वचन देतो. मी बाबू सारखा नाही. पायातलं वहाण पायातच पायजे हे भाऊचं तत्व आहे."४

कदाचित आईचे या वाक्याने सांत्वन ही झाले असेल पण पाध्यांचा क्रम साधण्याचा हेतू सफल होतो.

पाध्ये या कथेतून विशिष्ट संस्कारात वाढलेल्या कामगाराच्या मानसिकतेचे चित्रण करतातच, त्या बरोबरच बाबूची आई, बहिणी आणि सुरेखा यांच्या माध्यमातून स्त्रीचे शोषण स्त्रीच कसे करते हा विचार ठसीवपणे मांडतात.

या कथेत मूल होण्यासाठी आपणच कमी पडतो म्हंटल्यावर दुसऱ्या लग्नासाठी बाबू महागाई हे कारण शोधतो व आपली शारीरिक असमर्थता लपवतो. म्हणजेच पुरुषप्रधान समाजरचनेत उणीव पुरुषाची असली तरी ती लपवली जाते. ती लपवणे यात ही उदार पुरुषार्थ असल्याची भावना असते. पाध्ये हे सारे चित्रण अत्यंत संयतपणे करतात व कथेची परिणामकारकता अधिक गडद करतात.

खेड्यातून विविध समजुतीसह आलेल्या बंडू अवदारे या गृहस्थाची कथा म्हणजे "बायका खाणारी माणसे". अवदारे घराण्यातील सर्वच पुरुष ज्या विकृतीचे बळी ठरलेले असतात त्यातच बंडू अवदारे हाही सापडतो आणि त्याच्या पत्नीची शोकान्तिका होते. या शोकान्तिकेतून पाध्ये मुंबईतील चाळ संस्कृतीची ही वैशिष्टये शब्दबध्द करतात.

बंडू अवदारे सामान्य, सज्जन गृहस्थ, मूळ नारिंग्रे गावात त्यांचे एकत्र कुटुंब. पण त्याच्या सर्व भावांची बायका खाण्याबाबत प्रसिध्दी असते. बायकोचा छळ करुन तिला देवाघरी पाठवण्यात हे सारेच हातखंडा असणारे भाउ. त्यामुळे बंडू अवदारेच्या लग्नात अडचणी येतील असे वाटत असताना भामाचे वडील तिला त्याच्या गळ्यात बांधून मोकळे होतात. काही काळ त्यांचा संसार सुखाने चाललेला असतो. पण सरोदेबाईच्या घरात कामाला असलेली पदी चाळीत बातमी आणते की बंडू अवदारे रोज भामाला मारतो. चाळीत यावर उलटसुलट चर्चा झाल्यानंतर सर्वांची खात्री पटते.

बंडोपंताला चावक गुरुजी अक्कल शिकवण्याचा प्रयत्न करतात. त्यात अपयशी ठरलेल्या गुरुजींपासून सर्व चाळीचा हा चिंतेचा विषय होतो. मार्ग शोधण्यासाठी सातत्याने चर्चासत्रे सुरु असतात. चाळीतल्या मनोवृत्ती-प्रमाणे प्रकरण मंत्र्यापर्यंत नेण्याची भाषा बोलली जाते.

बंडोपंत हीरा नावाच्या बाईच्या नादी लागलेला आहे ही बातमी अप्पी हा हिरोगीरी करणारा मुलगा खात्रीलायकपणे सांगतो. या माहितीची सत्यता पडताळली जाऊन चिंता अधिक गडद होते. हेबळेंनाही केस बाळासाहेब देसायांपर्यंत न्यायची असते.

एक दिवस बंडोपंत हिरा राजरोस फिरु लागतात. नंतर हीरा त्याच्या घरातच रहायला येते. या सगळ्यात भामा हया सोशिक स्त्रीची अवस्था वाईट होते. मग चाळक-यांमार्फत पोलीसात केस नोंदवली जाते. पोलीस येतात आणि भामालाच पकडून ठाण्याकडे घेऊन जातात. कारण भामा ही आपली दुस-या क्रमांकाची पत्नी आहे असे बंडू भामाच्या सम्मतीने नोंदवतो आणि चाळकरी हतबल होतात.

बंडू अवदारे आणि त्याचे घराणे यांच्या भोवती केंद्रित झालेली ही कथा तमाम पुरुषी अहंकाराचे, पुरुषातल्या स्त्रीकडे पहाण्याच्यादृष्टीचे एक नीटस आणि नेटके चित्र आहे. दारिद्र्याने वेढलेल्या घरातील चिंता मुलीच्या जीवनाला ग्रासून टाकतात. आणि त्यामुळे तिच्या मनाला आलेला बधिरपणा हा तिच्या जीवनाच्या आसक्तीलाच खुडून टाकतो. लग्नानंतर पुरुषी अहंकाराखाली चिरडून जाण्याव्यक्तिरिक्त गत्यंतर नसते. मुळात असणारी लग्नाची बायको फक्त केविलवाण्या अवस्थेमुळे रखेलीपण मान्य करते. यात स्त्रीच्या जीवनाचे परंपरागत वस्तूमूल्य पाध्ये ताकदीने उभे करतात.

अशीच बाबीशेट डिचोलकरांच्या घरी वाढलेली सुनंदा आपल्याला "पोल्ट्री फार्मिंग" या कथेत भेटते. कार्यकर्ता म्हणून मिरवणाऱ्या उनाड अंबादास टिपटोळकरांच्या बेफिकीर वृत्तीने सुनंदाच्या आयुष्याची वाताहत होते. पुरुषसत्ताक समाजरचनेची ती बळी ठरते. वाहयात पुरुषांनी घोत-लेला हा स्त्री जमातीचा प्रातिनिधीक बळी भाउ पाध्ये आपल्या कथेत प्रत्ययकारीपणे चित्रित करतात.

अंबादास टिपटोळकर तोंडावर जगलेला, पोटभरायची अक्कल नसलेला व सतत संघटना बदलणारा कार्यकर्ता. कॉंग्रेस कमिटी एवार्डच्या लोकांनी त्याला पक्ष बांधणीसाठी पगारी ठेवून घेतल्यानंतर त्याच्या मनात लग्नाचे विचार जमू लागतात. अशातच बाबीशेट डिचोलकरांच्या घरात वाढणारी भाची त्यांना जड झालेली असते. ती अंबादासच्या गळ्यात बांधली जाते. अंबादासला तिला जगवणे अशक्य असते. अशातच अंबादासची नोकरी सुटते. याचवेळी सुनंदाला दिवस गेलेले असतात. तो तिला बाबीशेठकडे पाठवतो आणि वेश्या वस्त्या हुंगत हिंडू लागतो.

बाळंतपणानंतरही तिला नेण्याचे अंबादास टाळतो आहे हे समजल्यावर बाबीशेठ त्याला गाठतो व सुनंदाला त्याच्याकडे पाठवतो. सुनंदाला त्याच्या बाहेरच्या नादाची कल्पना येते आणि ती त्याचा तिरस्कार करु लागते. अशात औषधे न मिळाल्याने तिचे मूल मरते. नंतर तीही.सुनंदा मेल्याचे दुःख अंबादासला नसते. बाबीशेठला आपले पैसे उगाच खर्च झाले असे वाटत असते. एकूणच सुनंदा ही प्रतिनिधीक मानली तर स्त्रीविषयक पुरुषी समज आणि त्यांच्या वागण्यातले बारकावे पाध्ये या कथेतून वाचकासमोर ठेवतात.

मुंबईच्या बकाल दारिद्रयात जगणा-या माणसांना कधी-कधी समाधानाखातर दिवास्वप्ने पहाण्याची सवय लावून घेतात. कारण पोरांची लेंढार आणि संसार सांभाळता सांभाळता त्यांची दमछाक होत असते. यातून पळवाट म्हणून कधीकधी चमत्कारिक वागतात. त्यातून ही त्यांच्या जगण्याची शोकान्तिकाच होते. अशा मुंबईकर भास्कर राणेची कथा "बगीचा" कथेत वाचावयास मिळते.
जुन्या मोडकळीला आलेल्या चाळीत सात बाळंतपणे सहज पेललेली भास्कर राणेची पत्नी आपलं संकेतांचे तत्वज्ञान जोपासत जगण्याचा यत्न करत असते. तिची पहिली तीन मुलं जन्मल्यानंतर वरसरकायची तेव्हा भास्कर राणेला बढती, बोनस, डिफरन्स मिळत गेला. नंतरची चार मुले खाली सरकू लागली. भास्कर राणेची अधोगती सुरु झाली- हे त्याच्या पत्नीचे मत.

आपल्या मुलांना वाढवणे ही आपली जबाबदारी आहे असं भास्कररावला कधी ही वाटले नाही. अनु त्याची पत्नी सगळे कष्ट उपसत पोरांना वाढवत असते. तिचा मनात कुटुंबनियोजन करून घ्यायचे असते. पण भास्करराव सतत पळ काढत असतो. वैतागलेली अनु म्हणते "काय ऑपरेशन-बिपरेशन होणार नाही. मी आपली वाडिया हॉस्पिटलची

परमॅनंट वारकरीण आहे"[५] याचं भास्कररावला काहीही देणं-घेणं नाही.

असा भास्करराव गॅलरीत गुलाबाची झाडे लावत असतो. एक दिवशी केकू दमाणी त्यांच्याकडे येतो. गुलाबाची रोपं विकत देण्याची गळ घालतो. शेवटी भास्करराव पाचशेहे रुपयांना रोपं विकतो. ती ही एका चमत्कारीक स्वप्नमय अवस्थेत. पैसे घेऊन येतो तर लहान मुलीला अपघात झालेला, त्यातच पाचशेहे रुपये संपतात. आणि भास्करराव पूर्ण बदलतात. एक दिवशी बायका-पोरं झोपलेली असताना रॉकेल ओतून पेटवतो. खोलीला कुलूप लावून किल्लीची विल्हेवाट लावतो. चाळकरी घर फोडून सर्वांना बाहेर काढतात. तेव्हा भास्करराव व्हरांड्यात खुर्ची टाकून निवान्त बसलेले असतात. अनु मरतेवेळी "चिमणी भडकली आणि आग लागली" असा जबाब देते. पोरे नातेवाईक वाटून घेतात. तेव्हापासून भास्करराव टिळक ब्रीज वरून जाताना "केकू दमाणीया की माँ की चूत.!" एवढच ओरडतो. कधी कधी मध्यरात्री केकूच्या बेडरूमवर दगड मारतो. केकूला त्याची रोपं खरेदी करून कुठं हा ताप घेतला असं वाटू लागलं.

अशी ही दमदार आशयाची कथा. पाध्ये स्वप्न गुलाब आणि भास्कर राणे यांच्यात सुंदर वीण तयार करतात. भास्कररावचे वागणे चमत्कारीक का झाले ? याचे उत्तर वाचकालाच शोधावे लागते. सामान्य माणूस, त्याचं दारिद्रय कमालीचं बकालपण, यात त्याच्या जगण्याचे उडणारे रंग याचे कलात्मक चित्रण या कथेत करतात. त्यांची ही कथा म्हणजे त्यांच्या प्रतिभेचा एक अनोखा पैलू आहे. स्वप्न आणि गुलाब हे या कथेच्या आशयार्थाला अधिक गडद करतात.

सारांश:

पाध्ये विशिष्ठ जडण-घडणीतील स्त्री-पुरुष संबंधाच्या विविध ताण-तणावांचे अत्यंत सूक्ष्म व तपशीलांसह चित्रित करतात. पाध्ये हे मुळात

समाजवादी विचारसरणीचे लेखक असल्यामुळे सामान्य माणसाच्या जीवनात ते अधिक समरस होतात. तेथील पुरुषी अहंकार, स्त्रियांच्या वाटयाला आलेलं दु:ख अधिक आत्मीयतेने रंगवतात. आपला विचार पाध्ये कथेच्या उभारणीत अत्यंत कलात्मकतेने मिसळतात व वाचकात त्या बाबत चिंतनशीलता निर्माण करतात. याचे प्रत्यंतर त्यांच्या या कथा वाचताना येते. पाध्ये वास्तवाला कसे कथारूप देतात हे या कथांतून प्रत्ययाला येते.

उच्चवर्गीय स्त्री-पुरुष संबंधाच्या कथा:

मुंबई शहरात विविध जातीचे, धर्माचे, वर्गाचे लोक आपापल्या पध्दतीने जगत असतात. पाध्ये या सा-याचे वर्णन आपल्या कथांतून तपशीलांसह करतात.

मुंबईत जगणा-या उच्चवर्गीयांचे चित्रण मराठी कथेत यथासांगपणे अत्यल्प प्रमाणात आलेले आहे. पाध्ये या उच्चवर्गीय जीवनाचे दर्शन प्रत्ययकारी-रित्या घडवतात. उच्चवर्गीय जीवनाच्या अंतरंगात असणारे ताण-तणाव, तेथिल स्त्रियांच्या जगण्यातील मोकळेपणा, पुरुषांच्या जगण्यातील स्वच्छ-पणा याचे चित्रण पाध्ये आपल्या "पासवर्ड", वसुधारा, "धालीपीठ", "थिएटर" या कथांतून करतात.

"पासवर्ड" ही कथा पाल्याला स्वत:च्या बंगल्याच्या दारात अनेक गाड्या लावून हजारो माणसांचे पोट चालवणा-या फॅक्टरीचा मालक असणा-या दयानंद डोंगरकेरी उर्फ डी.जी. साहेब, शेली व डी.जी. साहेबांचा भाऊ स्वानंद यांच्यातील प्रतिष्ठित चाळयांचे वर्णन करते.

प्रचंड पैसा, प्रेमळ बायको आणि झगमगते वैभव असणारा डी.जी. साहेब आपल्या पी.ए. शेलीच्या प्रेमात अचानक पडतो आणि एक दु:ख

खरेदी करतो. शेली एक सालस, मध्यमवर्गीय कुटुंबातील पोरगी. पोटासाठी नोकरी करणारी. साहेबांशी वागताना तिचे तत्वज्ञान ठरलेले आहे. "मोठया लोकांच्या मोठया गोष्टी. मोठया लोकांच्या गोष्टीमध्ये लहान माणसांनी तर काहीही कुरकुर न करता व्यवस्थित नटबोल्टसारखं बसलं पाहिजे."[६] अशा शेलीबरोबर डी.जी. साहेबांचं सूत जमल्यानंतर तिच्या जगण्याचा नूरच बदलतो. डी.जी. साहेबांना शरीर दान करणं ही तिची गरज होऊन बसते. डी.जी. साहेब, पत्नी, मुलं व शेली अशा दुहेरी पातळीवर जगत असतात. पण स्वानंद डोंगरकेरी मध्येच टपकतो. स्वानंद डोंगरकेरी उर्फ बॉब शेलीला लग्नाची मागणी घालतो. शेली आपल्या तत्वाप्रमाणे होकार देते आणि संघर्षाला सुरुवात होते. एकाच घरात एका भावाची प्रिया दुसऱ्याची बायको होणार ही कल्पना उच्चवर्गाला न मानवणारी. डी.जी. साहेबाला शेली फक्त आपली रहावी असं वाटत असतं पण घरातील ताण टोकाला जातो. दोन भावांच्यामध्ये लोंबकळणारी शेली शेवटी डी.जी. साहेबांचे खोलीपण स्वीकारते.

संपूर्ण कथेतील घटना सहज घडत जातात. प्रत्येक घटना उच्चवर्गीयांच्या भोंगळ विश्वात भर घालणारी, माणसाला मन, भावना असते याचा विचार करायची ही सवड येथे कोणाला नसते. एखादी वस्तू आवडली की ती आपली करणे हा इथला व्यवहार. स्त्री ही त्यापैकीच एक वस्तू त्यांना वाटत असते. पाध्ये या कथेतून उच्चवर्गीयांच्या जगण्यातील भोंगळपणा अत्यंत समर्थपणे रेखाटतात आणि उच्चवर्गीय विश्वातील बुभुक्षितपणा, वासनांधता वाचकासमोर ठेवतात.

पाध्ये यांची अनेक वैशिष्टयांनी परिपूर्ण असणारी कथा म्हणजे "वसुंधरा" होय. मोकळेपणाने जगणाऱ्या वसुंधरा या स्त्रीची आणि रिसबूड या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

दिग्दर्शकाची ही कथा. ही कथा वसुंधारेची मनोवस्था जशी चित्रित करते तशीच रिसबूडच्या मुक्तजीवनाचा पटही वाचकाच्या समोर ठेवते.

वसुंधारा ह्या स्त्रीला आपल्या नाटकात घ्यायचे रिसबूड ठरवतो. याला कारण तिचे मोहक व्यक्तिमत्व. ही बाई फ्लॅटवाली, उच्चभ्रू वर्गातील, तिचा नवरा एक बडा ऑफिसर आहे. पण तिला मूलबाळ नाही. रिसबूडला प्रश्न पडतो की एवढया उमदया बाईची कुस उजली का नसेल ?

वांझबाई नाटकाच्या दृष्टीने सेफ. तालमी बुडायचा प्रश्न नाही. असे रिसबूडला वाटते. तिला नाटकात घेतो आणि तिच्या मोहक व्यक्तिमत्वामुळे त्याच्यातील पुरुष सहज तिला लगटतो. नाटकाच्या माध्यमातून जवळीकता साधून तिचा उपभोग घेण्याची चटक त्याला लागते. याबाबत लोक काय म्हणतील याची किंचित ही काळजी त्यानं बाळगलेली नाही. कारण तो म्हणतो की "माझा त्यांच्या स्टेनलेसस्टील नीतीवादावर विश्वास नाही."७

वसुंधारेला काहीही अभिनय जमत नसताना तो तिला जपत असतो. कारण ती त्याला मुक्तपणे व रसिकतेने उपभोग देत असते. शृंगाराची नवनवी डिझाइन्स ती तयार करत असते. तो ही तितक्याच रसिकपणे सर्व वैवाहिक बंधाने झुगारून तिचा उपभोग घेत असतो. यात त्याच्या नाटकाचा बो-या वाजण्याची शक्यता निर्माण होते. सौ. च्या तक्रारी वाढत असतात.

अशातच एके दिवशी वसुंधारा त्याला सांगते की मला नाटकात काम करता येणार नाही. कारण आपल्याला दिवस गेलेत.

एवढे आशयद्रव्य असणारी ही कथा. पण रिसबूडच्या म्हणजेच निवेदकाच्या जीवनात ही वसुंधारा जे तणाव निर्माण करते याचे मनोज्ञ

दर्शन पाध्ये या कथेत घडवतात.

मुळात वसुंधारा नावासकट रिसबूडला आवडलेली असते. तो म्हणतो, "मग आम्ही आमचे पौरुषत्व सिध्द करण्यासाठी सरसावलो. या वसुंधारेला नव-याच्या अफसरगिरीमुळे मिळालेले अलिशान वैभव भोगणा-या आणि सौंदर्यामुळे सा-या पुरुषजातीला आव्हान देणा-या मादीला एकदा नाटक ही चिज काय आहे हे दाखवून देणे आवश्यक होते. मी पुरुष होतो हे मग तिने ओळखावे. नाटक हेच माझे इंद्रिय होते. या नाटकानेच मी तिच्यासारख्या स्त्रीचे सुख लुटणार."[८] या मुक्त नैसर्गिक लैंगिक भूमिकेतून तो वसुंधारेचा उपभोग घेतो. यातून त्याची सरळ स्वभावी, जे मनात आहे ते स्पष्ट करणारी आणि रुढ नैतिकता न मानणारी मानसिकता स्पष्ट होते.

वसुंधारा ही लैंगिकता एक व्यवहार म्हणून पहात असते. ती रसिकपणे जगण्याचा प्रयत्न करत असते. यात भावनिक गुंतवणूकीचा प्रश्नच नाही. तिच्या वागण्यातील सहजता, लैंगिक व्यवहाराकडे पहाण्याचा तटस्थपणा पाध्ये आपल्या कथेतून समर्थपणे रेखाटतात.
वसुंधारेच्या जगण्यात संकोच नाही. स्वत:ला हवे ते मिळवण्यात काही गैर आहे असे ही तिला वाटत नाही. ती प्राप्त आयुष्य अंत:प्रेरणेने जगण्याचा प्रयत्न करते. भोंगळ नीतिवादाला कवटाळून जगण्यापेक्षा मुक्तपणे जगणे हेच रसिकपणाचे लक्षण आहे. हे पाध्ये जोरकसपणे या कथेतून प्रतिपादतात. उच्चवर्गीय जीवनातील तपशीलही वास्तवासहित चित्रित करतात.

ड्रामा प्रोड्यूसर सुहासिनीबाई, विकास-रेवा आणि बाबा वाळक्या यांच्या जीवनाची शोकान्तिका "थिएटर" या कथेत पाध्ये रंगवतात. प्रथमत: ही कथा आपल्यासमोर येते ती उच्चवर्गीयाची प्रतिनिधी ठरावी अशा सुहासिनीबाईंची कथा म्हणून.

सुहासिनीबाईंच्या नव्या नाटकाची अनाऊन्समेंट असल्यामुळे त्या पत्रकारांना पार्टी देतात. ही पार्टी रंगत असताना कोणतरी तिच्या नाटकातील नायक-नायिका, विकास-रेवा यांच्या लग्नाचा विषय काढतात. यामुळे विकास पार्टीत एकदम बेभान होतो.

नंतरच्या कालावधीत त्याचं वागणं बदलतं. तालमी बंद होतात. बंवडा ठोकून दिवस घालवणे हा त्याचा उद्योग बनतो. रेवाला त्यानं आपल्याशी लग्न नाही केलं तरी चालेल पण त्याचं नाटक सुटू नये यासाठी ती प्रयत्नशील असते. सुहासिनीबाई ही अस्वस्थ होतात.

रेवाला अचानक भेटलेला विकास सांगून टाकतो की त्याचे प्रेम तिच्या लहान बहिणीशी आहे. तेव्हा रेवा मानातल्या मनात सारं दुःख सहन करते. त्याला सम्मती देते आणि त्याच रात्री उंची दारुची बाटली घेऊन सुहासिनी बाईंचे घर गाठते. सुहासिनीबाई पट्टीची पिणारी. दारु आणि नाटक हेच तिच जगं. तिने ही कधीकाळी स्वप्नं पाहिली होती. पण उच्चभ्रू वैभवासाठी ती तशीच सोडून दिली होती. ती रेवाला समजून घेते. तिला नशेत बुडवते आणि सांगते, "माझं थिएटर संपलेलं आहे. रेवा, तू अद्याप जिवंत आहेस. तू पी. तुझं थिएटर अखंड चालू राहू देत."[१]

पाध्ये या कथेत उच्चवर्गातील अनेक घटक जीवन्त करतात. सुहासिनीबाईंच्या वैभवी श्रीमंतीचे अनेक चाळे बारकाव्यानिशी रेखाटतात. पत्रकारांचे जग, त्यांचा नशाबाजपणा, त्या जगातील गॉसिप पाध्ये तपशीलांसह वास्तवपणे उभा करतात. स्वतःला नाट्यसमीक्षक म्हणवणाऱ्यांचे ही जग पाध्ये वाचकांच्या समोर ठेवतात.

या कथेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ही कथा कलावन्ताचा कलंदरपणा ही प्रभावीपणे वाचकासमोर ठेवते. बाबा वाळक्यासारखा

एखादा चांगला नट दारुडया होतो आणि त्याच्यापेक्षा कमी जाण असणारी सुहासिनीबाई वैभवसंपन्न होते. हे वैषम्य ही वाचकाला अस्वस्थ करुन टाकते. या सर्वांमुळे पाध्ये यांची ही कथा यशस्वी ठरते.

भाऊ पाध्ये यांची "कुटुंब" ही कथा अनेक कारणांनी महत्त्वाची ठरते. पाध्ये हे व्यापक सहानुभाव बाळगणारे मानवतावादी लेखक आहेत याचा प्रत्यय आपल्यालाही कथा देते.

या कथेचा "मी" हा निवेदक भारतीय कुटुंब व्यवस्थेबद्दल तिरस्कार असणारा गृहस्थ आहे. तो आपले कुटुंब कोणतेही रुढ बंधन न पाळता वाढवतो. त्याला पैसा, प्रतिष्ठा, रुढ नैतिकता या गोष्टी बिनमहत्त्वाच्या वाटतात. तो कथेच्या सुरुवातीलाच म्हणतो, "मला आपल्या कुटुंब व्यवस्थेबद्दल आत्यंतिक चीड आहे. संताप आहे. या समाजाचे वाटोळे तर आपल्या कुटुंबव्यवस्थेमुळेच होते. एवढेच नाही तर आपला देश, आपला समाज किंवा एखादी व्यक्ती सुध्दा आपल्या कुटुंब व्यवस्थेमुळे आपली प्रगती करु शकत नाही. ही माझी ठाम भूमिका आहे"[१०] निवेदक मी चे हे विचार कुणालाही मान्य होणारे नाहीत. हे त्याला ही मान्य आहे. कारण आपली कुटुंब व्यवस्थेवर श्रध्दा आहे. ही निवेदकाने केलेली कारणमीमांसा आहे. हा निवेदक "मी" आपल्या कुटुंबाची जबाबदारी झटकण्यासाठी असे विचार व्यक्त करतो, असे नाही. त्याने कौटुंबिक जबाबदाऱ्या नीट पार पाडलेल्या आहेत. व्यवसायाने डॉक्टर असणारा निवेदक मुलांना एस.एस.सी. पर्यंत अत्यंत दक्षतेने शिकवतो.त्यानेत्यांच्या पुढील शिक्षणासाठी आर्थिक तरतुद केली. त्यांनी इंजिनिअर, डॉक्टर व्हावे ही अपेक्षा ठेवली नाही. त्याच्या मुलाला काय वाटले कुणास ठाऊक त्याने "पाव-भजी" सेंटर काढले. त्यात तो खूप कमवू लागतो. त्याला निवेदकाने विरोध केलेला नाही. मुलगी नीता-फिल्मी पत्रकार आहे. त्यातही निवेदकाला आनंद असतो.

मुलीला २१ वर्षे पूर्ण झाल्यादिवशी तो दोन्ही मुलांना व बायकोला पार्टी देऊन सांगून टाकतो, की मी पितृपदावरून निवृत्त झालो. त्याचवेळी बायकोच्या गळयातले मंगळसूत्रही तो स्वत:च्या हाताने काढतो. तिने दुसरा नवरा करण्याचा विचार केला तरी त्याचे ऑब्जेक्शन नाही. मुलाशी तो मित्र या नात्याने वागू इच्छितो. त्या अॅड. पंडिताची त्याला कमाल वाटते. ९ मुलीचा बाप. वय उलटून गेल्यावरही त्याच्या लग्नासाठी तो पैसा कमवत असतो. हे त्याला मान्य नाही.

त्याची नीता ही मुलगी जयपूर ट्रीपहून येते तेव्हा राजेंद्र गोस्वामी नावाचा हिरोटाइप पोरगा बरोबर घेऊन येते. त्याच्यासमोर नीता गरीब गाईसारखी वागते हे निवेदकाला मान्य नाही. "जिला मी एवढे स्वातंत्र्य दिले, तिने एका परक्या मुलाशी आज्ञाधारकपणे, नोकराप्रमाणे वागावं. हे मला कसंसच वाटतं."[११] असं तो म्हणतो. या गोस्वामी बरोबर स्वत्व हरपलेले नीताचे चाळे त्याला आवडत नाहीत. ते फक्त "जबाबदारी" या भूमिकेतून मुलगी म्हणून नव्हे.बायको त्याला सारखी सांगत असते की मुलीला शहाणपण शिकवा. पण त्याला हे मान्य नाही. पण तो हे मान्य करतो, की "स्वातंत्र्यवादी माणसं दुबळी असतात. कणखरपणाच्या अभावी त्यांचा जनतापक्ष होतो."[१२]

त्याची नीता,गोस्वामी बरोबर पळून जाते. सहा महिने त्याच्या बरोबर राहून चार महिन्याची गरोदर होऊन परत येते. तिने गोस्वामीबरोबर लग्नही केलेले नसते. त्यामुळे ती कुमारी माता होणार असते. वास्तविक निवेदक डॉक्टर असल्यामुळे तिचे पोट पाडणे त्याला काहीच अवघड नाही. पण तो तसे करत नाही. त्याबाबत तो म्हणतो, "नीताला दिवस गेलेत हे सगळया जगाला ठाऊक आहे. आता तिचा गर्भ पाडून का तिला उजळ माथ्याने फिरता येणार ? तो निलाजरेपणा ठरला असता." पण त्याच्या बायकोला हे मत मान्य नाही.

निवेदकाला मात्र नीताला मूल व्हावे. तिने ते वाढवावे असे वाटत असते. पण पत्नीचा त्रागा सुरुच असतो. निवेदक काहीच करत नाही असे पाहून चिरंजीव प्रकरण हातात घेतात. त्याला कुटुंबाच्या अब्रुची चिंता वाटाय लागल्यामुळे त्याला वडलांचा राग यायला लागला. एक दिवस निवेदक घरात नाही असे पाहून चिरंजीव नीताला बडवतो. दुसऱ्या दिवशी नीता जीव देते. शेवटच्या चिठ्ठीत ती लिहिते, "डॅडी तुम्ही ग्रेट आहात - मला क्षमा करा"[१३]

पाध्ये यांची ही कथा "डॅ. घोपेश्वरकरची" आठवण करुन देते. इतका तिचा आवाका मोठा आणि झपाटून टाकणारा आहे. कुटुंबसंस्था आणि तद्जन्य विषयाबाबतची पाध्ये यांची या कथेतून आविष्कृत होणारी मते चिंतनशील अशी आहेत. त्यातून त्यांची मानवता विषयक स्वतंत्र दृष्टी प्रत्ययाला येते. स्वातंत्र्य पचवता आले नाही तर येणारी गुलामी किती विचित्र असते याचे चित्र नीताच्या माध्यमातून उभा करतात. नीताला गोस्वामीने फसवावे ही गोष्टच याचे प्रतिक आहे. स्वत:च्या कल्पनेप्रमाणे जगणारा माणूस रुढ पारंपारिकतेकडे कसे पहातोय. याचे चित्रणही पाध्ये दमदारपणे करतात. त्यामुळे ही कथा यशस्वी व चांगली ठरते.

<u>"थालीपीठ"</u> कथेतील नीना सखाटे इंटलेक्चुअल समजली जाणारी, नवऱ्याशी घटस्फोट घेऊन घरात असलेली पण स्वत: पुरुषांबद्दल सावध कौरे आहोत असे भासवणारी. अशीही नीना सखाटे मधू या लेखकाची परिचित. पण लेखक मधू मात्र तिच्या या जगण्याचा वेगळा अर्थ लावत असतो. त्याच्या लेखक मतानुसार या नीना सखटेच्या दिखाऊ उच्चभ्रूपणातून लेखक मधुने केलेले उच्चवर्गीयांविषयीचे मतप्रदर्शन हेच या कथेत महत्त्वाचे आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कथेच्या सुरुवातीला ही नीना खाटे मधुला पाणीपुरीच्या गाडयाजवळ भेटते. तिच्या उच्चभ्रू संस्कृतीत असं गाडयावर खाणं पसंत नसतं. ती मधुच्या लेखनाची चौकशी करता करता शनिवारी त्याला थालीपीठची ऑफर देऊन निघून जाते. तिचा उत्साह, तिचा निवान्तपणा या विषयी मधुला नेहमीच आश्चर्य वाटत असतं.

ठरल्याप्रमाणे मधु शनिवारी तिच्या घरी जातो. तिने केलेले थालीपीठ त्याला आवडत नाही. ती प्रतिक्रिया सरळ तिला सांगतो. त्यानंतर ती इंटलेक्युअल गप्पा मारण्याचा प्रयत्न करते पण त्याला त्यात रस नसतो. फक्त तिचं मादीपण हेच त्याचं आकर्षण असतं. ती मात्र हेतूत: त्याच्यात व तिच्यात अंतर ठेवण्याच्या प्रयत्नात असते. याचा मधुला राग येत असतो.

इंटटलेक्युअल गप्पात येणारा गुडरिडींग, गुड टॉकिंग, गुड इटिंग प्रकार तिला अपेक्षित असतो. पण याचाच त्याला तिटकारा असतो. ती पॅपिलॉन क कादंबरीतील महारोग्याचा अंगठा चहाच्या कपाला चिकटून येतो ह्याचे वर्णन त्या कादंबरीत कसे केले आहे याचे ती चांगले ताणून वर्णन करत असते. थालीपीठ आठवलं नाही हे ऐकून ती नर्व्हस होते. तिनं कुठल्यातरी वर्तमानपत्रात लिहिलेला लेख त्याला सापडेल असा ठेवलेला असतो. तो वाचून ही तो आपली खरीखुरी प्रतिक्रिया व्यक्त करतो. नीनाचा मित्र कुमार आल्यानंतर तिला उत्साह येतो. ती गप्पा मारु लागते. पो पोरकट कुमार तिची बेहद्द स्तुती करून निघून जातो. मधुच्या लेखनावर चर्चा सुरु होते. त्याला त्यात कोणताच उत्साह नसतो. तो सरळ नीनाकडे चुंबनाची मागणी करतो. ती अस्वस्थ होते. तो चहाचा बाऊा उचलून न्याहाळत असतो. तेव्हा ती त्याला काय लागलंय का ? असं विचारते. तेव्हा तो पॅपिलॉनमधल्या अंगठयाप्रमाणे तिच्या सेक्सचा भाग चिकटून आला आहे का ? हे पहातं असल्याचे सांगतो. ती तो केव्हा जाईल याचीच वाट पहात असते. तो बाहेर पडतो. तिचे डोळे त्याचा पाठलाग करत असतात.

पाध्ये या कथेत स्वत:ला उच्चभ्रू, इंटलेक्चुअल समजल्या जाणाऱ्यांच्या जगण्यात किती खोटेपणा असतो, ही माणसं प्रतिष्टयेच्या नावाखाली किती भोंगळ, पोकळ आयुष्य जगत असतात, त्यांच्या जगण्याच्या कल्पना जशा खोटया असतात तशाच त्यांच्या भावनांना सांभाळण्याचे तकलादू प्रयत्न ही खोटे असतात याचे सुंदर वर्णन पाध्ये या कथेत करतात. प्रतिष्ठा, खोटं जगणं हे सगळेच कसे असते. हे पाध्ये मधुच्या वागण्यातून दाखवतात.

पाध्ये या कथेतून वाङ्मयविषयक मते ही पेरतात. नीना सखाटेचा सामान्य लेखां, "सामान्य वाचकांसाठी लिहिता आलं असतं तर लिहिलं असतं" "का लिहिलं नाही तर लिहावंसं वाटलं नाही" ही या कथेतील सगळीच विधाने पाध्ये यांची वाङ्मयीन भूमिका स्पष्ट होण्यास मदत करतात नीना सखाटे आणि सेक्स याबाबत लेखक मधूच्या माध्यमातून आपली त्याबाबतची ही सरळ, निसर्गधर्मी मते मांडतात.

<u>सारांश</u>: पाध्ये एकूणच उच्चवर्गीय जीवनातील खोटेपणा, प्रतिष्टेचा बुरखा, त्यांच्या लैंगिक सुखाच्या कल्पना याचे या कथांच्यामधून पूर्ण खोटेपण दाखवून आपली भूमिका स्पष्ट करतात.

## विकृत पुरुष-स्त्री संबंधाच्या कथा:

पाध्ये नपुसक पुरुष पती म्हणून पदरी पडलेल्या स्त्रियांच्या विषयी वेगळ्या समाजवादी नैतिकतेनुसार विचार करतात. त्याचप्रमाणे विकृत पुरुषांच्या सोबत संसार करणाऱ्या स्त्रियांच्या जीवनाचाही वेगवेगळ्या पातळ्यांवर विचार करतात.

या ठिकाणी या पुरुषांच्यामध्ये आलेली विकृती हीच स्त्रीचा बळी घेत असते. स्त्री ही एक वस्तू एवढीच या विकृत पुरुषांच्या लेखी स्त्रीची किंमत असते. ह्या विकृती सुध्दा वेगवेगळ्या स्वरूपाच्या असतात.

या विकृतींचा शोध घेऊन कथारूप देण्याचा प्रयत्न फारच कमी लेखकांनी केलेला आहे. भाऊ पाध्ये मात्र अशा विकृतीचा समर्थपणे वेध घेतात व त्यांना कथारूप देतात. त्याच बरोबर पाध्ये यांच्या अशा कथांमधून हिंसेचे चित्रही वेगळ्या स्वरूपाने येते. त्यांच्या कथेतील हिंसा सर्वस्वी भिन्न म्हणजे वास्तवपातळीवरची आणि मानवी मनाची आवर्तने दाखवणारी हिंसा आहे. हे भाऊ पाध्ये यांच्या कथेचे आणखी एक वैशिष्टय आहे.

त्यांच्या "फाईव्ह गार्डन", "मुरगी" या कथातून वाचकाला याचा प्रत्यय येतो.

"फाईव्ह गार्डन": ही आबा टुकरूळ व माई टुकरूळ या जोडप्याची कथा. आयुष्याच्या अखेरच्या दिवसात ही दोघं म्हातारा-म्हातारी एकमेकाच्या आधाराने जगत असतात. दोघांच्याही जगण्याला तसा काही फारसा अर्थ उरलेला नाही. ही दोघं फाईव्ह गार्डनमध्ये संध्याकाळी वेळ घालवत असताना गत आयुष्याचे ताण-तणाव आठवत असतात. त्यांच्या या आठवातून त्यांच्या गतजीवनाचे पदर उकलू लागतात. तेव्हा ती दोघांही घटनांचे अन्वयार्थ लावू लागतात. त्यावेळी त्यांच्या हाती कोणता हिशोब येतो. याचे चित्र पाध्ये आपल्या या कथेत चित्रित करतात.

पैसा हेच ज्याच्या जीवनाचे सर्वस्व आहे असा आबा टुकरूळ पूर्वी कधी म्युनिसिपालिटीत नोकरीला होता. पैसे खाण्याच्या नादात त्याची नोकरी जाते आणि त्याचे सर्व परिणाम माई टुकरूळ व तिच्या मुलाला भोगावे लागतात. आबा टुकरूळ आपल्या स्वार्थासाठी आपल्या पत्नीला व्यभिचार करायला भाग पाडतो. यात त्याला काही वावगे वाटत नाही. कोरेसाहेब

त्याच्या पत्नीशी राजरोस व्यभिचार करतो पण ऐनवेळी आबाला कसलीच मदत करत नाही. याचाच माई टुकरूला राग आहे. कथेची सुरुवात "फाईव्ह गार्डन" मध्ये हे जोडपं बसलेले असताना बागेत खेळणाऱ्या एका मुलाचा बॉल यांच्या जवळ येतो आणि दोघेही आपापल्या परीने त्या मुलाला जवळ बोलावण्याचा प्रयत्न करतात. त्याचवेळी माईला सत्याची, तिच्या मुलाची आठवण येते. ही आठवणच आबाला नको असते. कारण सत्या त्यांच्याकडं ढुंकूनही बघत नसतो. या सगळ्याला कारणही आबाच आहे फक्त तो मान्य करत नाही. त्याने आपल्या बायकोला व्यभिचारी बनवलं पण ते ही तो मान्य करत नाही. तरी सुध्दा नवऱ्याच्या सम्मतीने त्याच्यासाठी व्यभिचार करणाऱ्या माईच्या मनात त्याच्याविषयी आपलेपणा आहे. ती म्हणते, "माझा नवरा आहेस. कुणाच्याही खाली मला झोपवलास तरी मला काही म्हणायचं नाही. पण तुला सोडून मी जाणार नाही"[१४] कारण आधार एकमेकाला एकमेकाचा आहे. जगण्याला कुठलाच अर्थ उरलेला नाही. कुठल्यातरी अंधाऱ्या खोपटात उसळ-पाव खाऊन दिवस ढकलण्यात आणि मृत्यूची वाट पहाण्यात त्यांचा प्रत्येक दिवस चाललेला आहे. त्या दिवसाची संध्याकाळ या "फाईव्ह" गार्डन" मध्ये ते घालवत असतात.

नोकरीवरून काढल्यानंतर आबाने बायकोला वेश्या केले पण त्याही अवस्थेत तिला तिच्याकडे येणारा जवान ऑफिसर आवडायचा. तो यायचा तेवढाच काळ तिच्या सुखाचा गेला. पण आबाला मात्र त्याचं येणंच पसंत नव्हतं. पण माईला तो स्वच्छ जवान घाणेरड्या राजकारणी पुढाऱ्यांपेक्षा बरा वाटायचा.

इथे पाध्ये त्याच्या नवरेपणाचा सूक्ष्म अहंकार अत्यंत चुकपणे रंगवतात. आपली बायको कोरेसाहेब किंवा अन्य माणसाखाली झोपलेली त्याला चालते. पण त्या जवानाखाली झोपलेली मात्र आवडत नाही कारण ती इतरांशी

झोपताना फक्त निर्जिव वस्तु सारखी व्यवहार पार पाडते. पण जवानाशी मात्र जीव लावते. त्याला नको होते. म्हणून तो गल्लीतल्या पोरांना कोरेसाहेबांना गोळा करून या जवानाला पकडाय लावतो. त्याला बेदम मारलं जातं. तेव्हा याला सुख वाटतं. माईला मात्र आश्चर्य वाटत होतं ते याचच की "त्याक्षणी कोरेसाहेब घरी येऊन बसलेला. जो माणूस आपल्याबरोबर झोपायचा तोच माणूस मला दुसऱ्या पुरूषाबरोबर झोपण्याविरूद्ध लेक्चर देत होता."[१५] याचं.

त्या जवानाला आपणच योजनापूर्वक पकडून दिलं ही गोष्ट त्यानं आजपर्यंत तिच्यापासून लपवून ठेवलेली. पण ती आज सांगितल्यानं त्याला समाधान वाटतं. मग तो आपल्या अनेक गोष्टी सांगू लागतो. त्याच्या क्रिकेटर होण्याच्या इच्छेपासून ते आपणाही इतर बायका कशा भोगल्या इथपर्यंत. पण माईचं लक्ष त्याच्या बोलण्याकडे नव्हतेच. ती दोघं घरी येतात. झोपी जातात. तेव्हा माई त्याचा गळा आपल्या धुनेराने आवळून खून करते. आबा सुटकेसाठीही धडपडत नाही.

या ठिकाणी पाध्ये कथा संपवतात. पण वाचकाच्या मनात मात्र अनेक प्रश्नांची वादळं निर्माण करतात. त्या जवानाबद्दल तिच्या मनात असणारे प्रेम, नवऱ्याविषयीचा असणारा तिरस्कार, आपली मुलं आपल्यापासून दूर गेल्यामुळे मनात निर्माण झालेली पोकळी हे सर्व पेलणारं माईचं मन म्हणजे एक ज्वालामुखी. पण पाध्ये अत्यंत संयमाने माईची व्यक्तिरेखा उभी करतात. पोलीसठाण्यात आपले नाव वेश्या म्हणून रजिस्टर आहे याची खंत न वाटणारी माई टुकरू या जवानाबाबत इतकी व्याकुळ होते त्याच्यामुळेच तिला फक्त चार दिवस सुखाचे मिळाले आहेत. नवऱ्याने फक्त तिला कुंकवाचा आधार दिला आहे.

या दोघांच्या जीवन व्यवहाराकडे पाध्ये अत्यंत तटस्थपणे पहातात. स्त्रीकडे वस्तू म्हणून, उपभोगाचे एक साधन म्हणून, कसे पाहिले जाते याचे

वर्णन ते या कथेत साधतात. विकृती पुरुषात कसे बळावती याचे ही चित्र येते. "फाईव्ह गार्डन" लहान मुलाचा बॉल" संध्याकाळ, चम्याची फुटलेली काच या साऱ्यांना पाध्ये या कथेत प्रतीकरूप देतात. आणि कथेचा आशय अधिक गडद होऊन जातो. नवरा आणि बायको यांचे असलेले हे जगावेगळे संबंध आणि त्यांची मानसिकता पाध्ये या कथेत यथार्थपणे रंगवतात यामुळे आबाची विकृती ठळक होते. स्वत:चे अध:पतन झालेल्या व्यक्तीला स्वातंत्र्य गमवावे लागते व तो अधिकच अध:पतित होतो. याचे चित्र ही पाध्ये याकथेत समर्पकपणे चित्रित करतात.

विकृती बळावलेल्या पुरुषाला स्त्रीचे मूल्य वस्तूपलीकडे नसते. तो ती त्याला हवी-हवीशी वाटणारी मुरगी समजतो. याचे चित्रण पाध्ये "मुरगी" या कथेत करतात. संपूर्ण कथेत पाध्ये पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेने पोसलेल्या मनोविकृतीचे, स्त्रीकडे पहाण्याच्या दृष्टिकोणाचे मनोज्ञ दर्शन या कथेत घडवतात. या कथेत एदी आणि केरु गाबत्या यांचे जीवनविश्व येते. याबरोबरच शिरनाळ्या आणि त्याची पत्नी रुक्मिणी यांचे उघाडलेले आयुष्य चित्रित होते.

केरु गाबत्या हेलकरी समाजातील हमाल. पण राज्य लॉटरीमुळे त्याचे आयुष्य बदलते. तो लॉटरीच्या पैशाची अत्यंत योजनाबध्द विल्हेवाट लावतो. त्यातील काही पैशावर व्याजाने पैसे देण्याचा धंदा सुरु करतो आणि तो गाबत्या हमालाचा गाबते मास्तर होतो.

या सेफ धंदयाने त्याचा वट निर्माण होतो. अनेक लोक त्याची चमचेगीरी करु लागतात. मुंबईच्या जीवनात पैसा माणसाच्या जगण्याचा स्तर कसा बदलतो हे ही पाध्ये येथे चित्रित करतात.

या केरु गाबत्याच्या जगण्याचा स्तर बदलला तरी त्याच्या सुख, चैनीच्या कल्पनामात्र पूर्वी सारख्याच आहेत. केरु गाबत्याची आवडती वस्तू मुरगी. मुरगी खाताना त्याचा हावरेपणा दिसून येतो. तो तसाच कायम आहे.

केरू गाबल्याचं वय ३९ वर्षं आहे पण त्याच्यातला मर्दपणा संपला आहे. हे गाबल्याचा मित्र आबा याला कुलाब्याच्या वेश्येकडे गेल्यानंतर कळते. केरू गाबल्यानं एवढ्या लवकर आटपावं है आबाला पटत नाही. कारण "जो पर्यंत माणूस चोदण्याला काबील आहे तो पर्यंत त्याच्या जगण्याला अर्थ आहे. नायतर त्याची जिंदगी संपली असं मानायला पायजे"[१६] हे इथल्या जगण्याचे तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे केरू गाबल्याही आपलं काही हरवलं आहे या भावनेनं अस्वस्थ आहे.

पैसा व प्रतिष्ठेमुळे आपण लग्न करावे असे विचार केरू गाबल्याच्या मनात यावयास लागतात. त्यादृष्टीने तो शिरनाळ्याच्या पदीवर डोळा ठेवून तिच्या घरात पैसे पेरू लागतो.

शिरनाळ्याच्या पदीला केरू गाबल्या अजिबात पसंत नसतानाही फक्त गरिबीमुळे तिला त्याच्या गळ्यात बांधले जाते. त्यामुळे पदीची अवस्था गाबल्याला आवडणाऱ्या "मुरगी" सारखी होते.
पहिल्याच सुहाग रातीलाच केरू गाबल्या पदीचा भोग घेण्याचा प्रयत्न करून थकतो. तरी त्याच्या शरीरात "जान" येत नाही. पदीला हे ओळखू येते तेव्हा ती म्हणते - "तुम्ही मर्द नव्हता तर माझ्याशी लग्न करायची एवढी खटपट का केलीत."[१७] ते शब्द त्याच्या डोक्यात सळी सारखे फिरतात. पदी बायको नसून ती कुलाब्यांची वेश्या आहे असा भ्रम होऊन तो तिचा खून करतो. नंतर त्याच्या शरीरात जान येऊ लागते.
पाध्ये यांची ही कथा अनेक कारणांनी महत्त्वाची आहे. मुंबईतील हमालांचे जीवन या कथेत येतेच. त्याबरोबरच त्यांच्या जीवनातील विविध जीवन विषय संकल्पना ही या कथेतून आपल्यासमोर येतात. आई - मुलगी या नात्यात पोटची भूक कशी आड येते याचे अस्वस्थ करणारे चित्र या कथेत चित्रित होते.
पैसा हे इथल्या जीवनाचे महत्त्वाचे मूल्य आहे. कालपर्यंत हमाल असणारा

गृहस्थ लखपती होताच मास्तर होतो. त्याच्या जगण्याचा स्तर बदलतो. हे मुंबईचे वैशिष्टय आहे. स्वत:त पुरूषपण शिल्लक नाही हे माहित असून ही तो पदीशी लग्न करतो कारण स्त्री पैस्यावर विकत घेता येते. कोंबडी आणि पोरगी यांची किंमत सारखीच आहे. ही इथल्या संस्कृतीची रीत पाध्ये जोरकसपणे चित्रित करतात.

पाध्ये रूढ नैतिकतेच्या आहारी जाणारे लेखक नसल्यामुळे ते या कथेच्या माध्यमातून केला लैंगिक पैलू ही दाखवतात. रांडेकडे जाणे, तिने नामर्द ठरवणे हे इथल्या जीवनात फारसी महत्त्वाची मानली जाणारी गोष्ट नाही. इतकी ती सहज आहे. पाध्ये या कथेत इथल्या लाचारीचे, भडवेपणाचे, दारिद्र्याचे चित्रणही अत्यंत समर्थपणाने करतात.
मानसशास्त्रीय दृष्टयाही ही कथा महत्त्वाची ठरते. मुरगी खाताना केव्वी गळणारी लाळ, त्याचा हावरेपणा यांच्या तपशीलातून त्याच्या मनात एखादी गोष्ट मृत करून आत्मसात करण्याची लालसा कशी निर्माण झाली आहे हे पाध्ये दाखवतात.
केला पत्नीचाही वेश्या म्हणून भ्रम व्हावा ही त्याच्यात बळावलेली विकृती पाध्ये योग्यतेने वाचकांसमोर मांडतात. चैतन्य संपल्यानंतर त्याचा भोग घेण्याची प्रवृत्ती हा ही एक विकृतीचाच भाग. पाध्ये या सर्व गोष्टीचे अत्यंत समर्पक वर्णन या कथेत करतात. त्यामुळे ही कथा यशस्वी होते.

सारांश:

पाध्ये या प्रकारच्या कथांतून मानवी मनात बळावणाऱ्या विकृती व त्यांचे स्वरूप मांडतात. पुरूषांच्या मनात असणारे स्त्रीचे वस्तुमूल्य व त्यांची वस्तू म्हणूनच होणारी देवाण-घेवाण याचे ही चित्र पाध्ये अशा कथांतून वाचकासमोर ठेवतात.
विकृती बळावलेल्या माणसांची विकृती लपवण्यासाठीची खटपट, त्यांचे

जगण्याचे तत्वज्ञान आणि ताण-तणाव यातून त्यांचा विश्वाचे समग्रदर्शन पाध्ये वाचकांना घडवतात.

या विकृतीतून जन्म पावलेली हिंसा ही किती वास्तव आणि सार्वत्रिक आहे याचा पडताळा ही या कथांतून येतो.

त्यामुळे या विभागातील कथा महत्त्वाच्या ठरतात.

नपुंसक पती प्राप्त स्त्रीच्या वैवाहिक जीवनाच्या कथा:
======================================

रूढ नैतिकतेच्या नावाखाली भारतीय लग्न संस्थेला नको इतके महत्त्व प्राप्त झालेले आहे. स्त्रीला निर्जिव वस्तू अथवा पाळीव प्राणी समजून तिला समाजव्यवस्थेत वागवले जाते. तिच्या मनाचा, भावनेचा विचार करण्याची कुणालाच गरज वाटत नाही. शुचितेच्या कल्पनेची चौकट तिच्यावर लादून तिला असाहय करण्याचे प्रयत्न पुरूषप्रधान भारतीय संस्कृतीने पुरेपुर केलेले आहेत. यातूनच लग्न या व्यवस्थेला बळकटी येत गेलेली आहे.

"लग्न" या प्रक्रियेत स्त्रीला कोणतेच स्थान नसल्यामुळे तिची पसंती अथवा मत या व्यवहारात विचारात घेतले जात नाही. त्यामुळे तिला संग्राहालयातील मूक प्राण्यासारखे प्रदर्शन मांडून लग्न या संस्थेचे सभासद केले जाते. अशा स्वरूपाच्या विवाहाचे पर्यवसन चांगल्या संसारात होईलच असे मात्र नसते. तिच्या पदरी पडलेला जोडीदार तिच्या योग्यतेचा, तिला हवा वाटणारा असेलच असे नाही. यामुळे त्या स्त्रीला आयुष्यभर भावनांचा कोंड-मारा करण्याचीही वेळ येते. तर काहीवेळा तडजोडीवर संसार चालवावा लागतो. अर्धे अधिक विवाह हे अशा तडजोडीवर चाललेले असतात.

काही स्त्रियांच्या वाट्याला आलेले पती हे फक्त नावाचेच पती असतात तेव्हा त्या स्त्रीने त्याला सोसून भावना जाळून संसार करावा असे रूढ नैतिकता सांगते. पण हाच नियम पुरूषाला मात्र लागू नाही. त्यामुळे

अनेक स्त्रियांच्या वाटयाला असह्य दु:ख येते. त्यातच त्यांच्या जीवनाची शोकान्तिका होते. तर काहींना आपल्या शरीराचा कोंडमारा आवरता येत नाही. या स्त्रिया आंतरिक रेटयाने पुटेल त्या वाटेला धावतात. तेव्हा समाजाची रूढ नैतिकता त्यांना उठवळ मानते.
पाध्ये यांच्या समाजवादी विचारसरणीला व नवनैतिकतावादी भूमिकेला या गोष्टी मानवणाऱ्या नाहीत. त्यामुळे पाध्ये यांच्यातील लेखक अशा स्त्रियांच्या जीवनाकडे, त्यांच्या दु:खाकडे वेगवेगळया पध्दतीने पहातो. त्यांचे आपल्या पध्दतीने विश्लेषण करतो.
या स्त्रीला असणारे वस्तूमूल्य त्यांना मान्य नाही. त्यामुळे स्त्रीवर होणाऱ्या या अन्यायाचे चित्र ते आपल्या कथातून रंगवतात. यामध्ये अन्यायाचे परिमार्जन हा हेतू नाही. फक्त ते वास्तव वाचकाच्या समोर ठेवतात आणि त्याला विचारप्रवण करतात. याचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या "नवरा", "आक्करमाशा", "गुदाम" या कथेतून येतो.

<u>"नवरा"</u>: या कथेत काकूचे जीवन तिच्या नपुसक पतीमुळे बरबाद होते. तिला तिच्या भावनांचा कोंडमारा सांभाळता येत नाही. ती दुसऱ्या पुरूषांना जवळ करू लागते. त्यांच्याशी संग करून आपली भावनिक भूक भागवू लागते. पण या तिच्या सहज जाण्याला मात्र वाह्यातपणा समजून तिच्या वाटयाला जे दु:ख येते त्याचे वर्णन या कथेत केलेले आहे.

या कथेचा निवेदक मी हा लहान आहे. त्याच्या मनाची पाटी समाजाच्या रूढ नैतिक अनैतिकेतेबाबत कोरी आहे. फक्त त्याला लग्नाच्यावेळी काकू अत्यंत आवडते. ती आपली आहे ही भावना त्याच्या मनात बळावत जाते आणि तो तिला चिकटतो.
पहिल्याच रात्री काकूला काका नामर्द असल्याची खात्री पटते. पण त्याच्याशी लग्न झाल्यामुळे ती त्याच्यापासून बाजूला जाऊ शकत नाही.

रूढ नैतिकतेत ही कल्पना बसणारी नाही.

काकू आपल्या एका मैत्रिणीबरोबर बोलत असताना दिपूचा - निवेदकाचा उल्लेख आपला नवरा असा करते. दिपूला यातील काहीच कळत नसते व "नवरा" ही गोष्ट त्याला मुळीच आवडत नसते. तो म्हणतो -

"मला नवरा नावाची गोष्ट मुळीच आवडत नाही. नवरा असला म्हणजे त्याला नवरी असते. मला नवरी मुळीच आवडत नव्हती. काकूने माझी नवरी व्हावे हे मला मुळीच पसंत पडले नाही."[१८] या म्हणण्यातून त्याची निर्व्याज मनाची कोरी पाटी आपल्याला दिसते.

तो काकूने त्याचा उल्लेख नवरा असा केल्यापासून तिच्याकडे जाणे ही बंद करतो. त्याच्या बालवागण्यानुसार तो आपले वर्तन ठेवतो. काकू आपल्या नपुसक नव-याबरोबर दिवस काढत असताना शरीराच्या निसर्गधर्माला आवरू शकत नाही.

एके दिवशी काकूला काका गाल सुजेपर्यंत मारत असतो. दिपू ते पहातो आणि त्याला वाईट वाटते. पण काका तिला का मारतो आहे मात्र कळत नाही. काकू नरेंद्र नावाच्या माणसाच्या नादी लागलेली आहे. तिने लाज सोडलेली आहे ही वाक्ये तो ऐकतो. पण त्याला नादी लागणे, लाज सोडणे याचा अर्थच लागत नाही.

पण काकूच्या या वागण्याने घरात भांडणाला सुरुवात होते. आई, बाबा काकाशी भांडू लागले. त्यांच्या मतानुसार काकू खूप वाईट वागते. काकाने तिला घेऊन घर सोडावे असे सांगताना आई म्हणते —

"ही बाजार बसवी कोण सांभाळणार घरात! उद्या आमच्या घरात पाहुण्यांची रीघ लागायची हिच्यामुळे" या आईच्या बोलण्यावर काकू कधी नाही एवढी संतापते. म्हणते —

"कुणाला बाजारबसवी - बाजारबसवी म्हणून बोलता ? काय करू मी या दीराला घेऊन ? बिनबुडाचा माणूस माझा पदरात बांधलात आणि मी

जन्मभर कुंवार राहू काय ? तू राहिली असतीस काय बये ./ .... गेली असतीस शोधायला आपले पाहुणे रस्तोरस्ती, आपलाच दाम खोटा आणि वर गला दोष./"[१९] आपल्या मनाची तगमग ती ओकते. पण काका आपला नामर्दपणा आता चव्हाटयावर येणार म्हणून घाबरतो. बायकोचीच बाजू घेतो आणि तिला घेऊन दुसऱ्या घरात बिऱ्हाड करतो. त्यावेळी काकू रमाकान्त दादाला लागू होते. दिपू एकदा खिडकीतून पहातो तर रमाकान्त दादाला काकू मिठी मारते. त्याच्या मनात विविध भावनांचा कल्लोळ उठतो. तो दुपारी कोणीच नसताना काकूची खोली गाठतो. रमाकान्तदादा काकूला जसे करतो तसे करू लागतो. तिच्या अंगाशी झोंबू लागतो. तिच्या पोलक्यात हात घालू लागतो. काकूच्या लक्षात आल्यानंतर तिने दिपूला बेदम बडवले आणि ढसढसा रडू लागली. दिपूला राग तर येत नाही उलट आपली काकू सापडली असे त्याला वाटू लागते. कारण त्याच्या मनाची पाटी रूढ नैतिकतेने संस्कारित झालेली आहे. समाज मान्य नैतिकतेचा पगडा त्याच्या मनावर इतका पडलेला आहे की त्याला तेच संकेत प्रिय वाटू लागतात.

आपल्या समाजात मनाच्या कोऱ्या पाटीवर कसे संस्कार घडवले जातात याचे दर्शक म्हणून तर ही कथा उत्तम आहेच त्याबरोबर पुरुषप्रधान समाजरचनेचे पैलू दाखवणारी कथा म्हणूनही ती उत्तम आहे.
पुरुष नामर्द असला तरी त्याचे नामर्दपण स्त्रीने जाहिर न करणे यात तिची मर्यादशीलता असते. त्याच्या नपुंसकपणाला गोंजारत स्वत:ला कोंडून ठेवण्यात तिचे साध्वीपण असते असे मानणाऱ्या रूढ नैतिकतेनुसार काकू मात्र बाहेरख्याली ठरते. कारण ती आपल्याला हवं तसं जगण्याचा प्रयत्न करते. काकू नैसर्गिक शारीरधर्म दडपून जगली असती तर साध्वी ठरली असती.

पाध्ये यांनी या सारख्या आपल्या कथांतून रूढ नैतिकतेला छेदण्याचा प्रयत्न केलेला आहे.

"अक्करमाशा": या कथेत अन्याच्या आईचा नपुंसक नवरा. अण्णा अंथरुणावर खिळलेला असताना तिच्या मनात जे ताणतणाव निर्माण झालेले आहेत त्याचे वर्णन पाध्ये करतात. अन्याची आई आपल्या जीवनाकडे कसे पहाते. अन्याला आईविषयी काय वाटते. जो बापच नाही पण बाप म्हणून नाव लागलेले आहे. त्याच्याविषयी त्याच्या मनात कोणते विचार आहेत. याचे वास्तव व सुन्न करणारे चित्र पाध्ये या कथेत रंगवतात.

कथा मुंबईच्या एका बकाल चाळीत घडते. अन्याचे अण्णा अंथरुणाला खिळलेले आहेत. त्यांची पत्नी म्हणजे अन्याची आई ते शेवटच्या घटका मोजत असताना आपल्या साड्यांचा स्टॉक मोजत असते. याचा अन्याला राग येतो. तेव्हा ती म्हणते — "मग, मी काय करू ? मला कंटाळा आला, त्यांच्याकडं नुसतं पहात बसून बसून"[२०] आई असे का करते हे त्याला माहित आहे. पण त्याला ही जनरीतीसाठी आईने असे वागू नये असे वाटत असते.
बकाल चाळीत वाढलेल्या अन्याचा कंगाल पोरांचा गँग. त्याचे जगणे यात ही अन्याच्या अण्णाचे नपुंसकपण अत्यंत सूचक शब्दात व्यक्त करतात.
अन्याच्या आईला लखुमामाने म्हणजे तिच्या भावाने पैशाच्या मोहापायी अण्णांना जवळजवळ विकलीच. नपुंसक अण्णाबरोबर लग्न झाल्यानेत अन्याची आई संसार सांभाळता सांभाळता भावनिक पूर्ततेसाठी तावडेशी संग करते.
अन्या तावडेपासून झालेला मुलगा. पण लागला मात्र अण्णाच्या नावावर.
या सगळ्यामुळे अन्याच्या आईच्या मनात सर्वाधिक संताप आहे. तो लखुमामा विषयी.
शेजारी-पाजारी येतात पण त्यांच्या समोरही अन्याच्या आईला देखावा करता येत नाही. त्याची ही चाळीत चर्चा असते. रात्री अण्णाला जास्त

झाल्यावर आई अन्याबरोबर पत्ते खेळण्यात दंग असते. अण्णा प्राण सोडतात. तेव्हा अन्या घाईने लखुमामाला उठवण्यासाठी जातो तेव्हा आई त्याला म्हणते "थांब रे मी आपल्यासाठी कॉफी करते. नाहीतर एकदा ही वर्दी सर्वांना लागली म्हणजे पाण्याचा थेंब मिळायचा नाही आपल्याला"[२१] इतकी ती आण्णाच्या मृत्यू बद्दल कोरडी आहे. लखुमामा सांगतो म्हणून ती प्रेताजवळ समई लावते. आई सोपस्कार आटोपतानाही निर्विकार असते.

सुतक असल्यामुळे अन्याला घरातून बाहेर पडता येत नाही याचे वाईट वाटत असते. आईचा प्रियकर तावडे आईला भेटायची तारीख देतो. अन्या याच वेळी आपल्या पुष्पा बरोबर त्या हॉटेलात जाऊन आईला मुद्देमालासह पकडण्याचा इरादा करतो. त्या तारखेला त्या हॉटेलात जातो ही पण त्याला आपल्या आईसमोर जाण्याचे धाडस होत नाही तो पुष्पाला घेऊन आई व तावडे यांच्या मागोमाग तसाच परततो.

एकदा अन्या कामावरून परत येत असताना लोकलमध्ये एक भिकारी - "मै खानदानी हूं .... जो आदमी अक्करमास होता है, जो खानदान - माता-पिताके पेटसे पैदा नही होता, वो इन्सान नही होता, और कभी भी दुसरे को मदत नही करता" असे बडबडत भीक मागत असतो. अन्या त्याला बोलावतो. खिशातून हातात येतील तेवढे पैसे त्याला देतो आणि म्हणतो मी अक्कर-मासा आहे. भीक घातली. आता माणूस आहे का नाही सांग ? भिकारी निघून जातो.

कथेत पाध्ये अन्या या अक्करमाशा मुलाचे भावविश्व मोठया ताकदीने रंगवतात. त्याबरोबरच चाळीतल्या दिखावू प्रतिष्ठेच्या कल्पनाही वास्तवपणे चित्रित करतात. नपुसक नव-याबरोबर संसार करणारी अन्याची आई, पेशासाठी नपुसकाच्या गळयात बळिण बांधणारा लखुमामा या सा-याच ठ व्यक्तीरेखा पाध्ये अत्यंत खुबीने रंगवतात.

या बरोबरच रूढ नैतिकतेमुळे एक स्त्रीच्या वाटयाला आलेले दु:ख तिच्या संततीला भोगावे लागणारे पोरकेपण याचेही यथार्थ चित्राण करतात.

"गुदाम":ही भाऊ पाध्ये यांची गाजलेली कथा. या कथेत पाध्ये माणसाची अगतिकता आणि त्याचे वर्तनबद्दल याचे सुरेख चित्रा रेखाटतात. एडेकर, धार्मा आणि येसू यांच्या जगण्यातील ताण-तणाव या कथेत शब्द-बध्द केलेले आहे. स्त्रीचे जीवन हेच मुळी एक कोंडलेले "गुदाम" आहे. या गुदामात हजारो वर्षे रखडत पडलेली रखडत, किडत पडलेली रूढ नैतिकतेची पोती आहेत. ज्यामुळे या जीवनाला वस्तूमूल्य प्राप्त होते. प्रतीकांच्या माध्यमातून ही कथा पाध्ये अत्यंत कलात्मक आणि आशयघन करतात.

या कथेत एका आडवळणी गावात बांधलेल्या सरकारी गुदामावर एडेकर हा सुपरिटेंडट आहे आणि धार्मा हा शिपाई आहे. एडेकरला महिन्यातून फक्त दहा मिनिटे काम असते. रिपोर्ट देण्याचे. धार्माला एडेकरच्या सेवेचे काम असते. या गुदामात फक्त तीन पोती आहेत. तरीही सरकारने ते गुदाम जोपासलेले आहे.

या गुदामात सास-याचा डोक्यात दगड घालून खून करणारी येसू येते. आणि तणावाला सुरूवात होते. येसू गुदामात येण्यापूर्वी तिची चविष्ट चर्चा करणारी ही दोघं गुदामात आल्यानंतर मात्रा एकदम अस्वस्थ होतात. तिला बाहेर घालवावं यासाठी प्रयत्न करतात पण नंतर एडेकर तिच्या शरीरावर आसक्त होतो. व तिचा भोग घेत रहातो.

सरकार गुदाम हालवण्याचा निर्णय घेते. आता या येसूला कोठे न्यायची या विचाराने एडेकर कमालीचा अस्वस्थ होतो. तिला आपली पत्नी मानण्याचे धाडस त्याच्यात नाही. तो तिला हाकलवून लावण्याचा निश्चय करत असतो पण त्यातही त्याला सफलता प्राप्त होत नाही.

धार्मीची बदली होते. नंबर एडेकरची. एडेकर वैतागतो. येसूला जा म्हणून विनवतो. त्याला ताप येतो. त्या रात्री तो गुदामातून बाहेर येतो. येसू गळफास लावून घेते. एडेकर परत येतो. गुदामात तिचा देह लटकत असतो.

या आशयद्रव्यावर पाध्ये यांनी अवस्थ माणसाची मानसिक अवस्था अत्यंत ताकदीने रंगवली आहे.
एडेकरला येसू हवी आहे पण तिला राजरोस पत्करण्याइतपतचे धाडस त्याच्यात नाही कारण ती खुनी आहे. तिनं जावं असं वाटतं पण त्याला सोडवत नाही. विचित्र स्थितीतला एडेकर धार्मीच्या आधारानं दिवस रेटतो पण तो आधार संपल्यावर कोसळतो. त्याची मानसशास्त्रीय वर्तने पाध्ये चांगलीच पकडतात. येसूनं नपुंसक नवऱ्याबरोबर संसार करताना आपला भोग सासऱ्यानं घ्यावा हे न पटल्यामुळे त्याचा खून करते. मात्र एडेकरला स्वेच्छेने भोग देते. तिच्या तोंडी कोणताच संवाद न घालता ती मात्र सर्व कथेभर आपले अस्तित्व पसरते.

गुदामातील तीन पोती, तीन माणसं एकमेकाची व्यक्तिमत्वे एकमेकाला देऊन टाकतात. माणसं कीडतात तशीच पोती किडलेली आहेत. पण ती आहेत म्हणून गुदामाला अस्तित्व आहे. माणूस आहे म्हणून विश्वाला अर्थ आहे.

गुदाम हालवले जाते. एका माणसाच्या येण्यानं अथवा हालण्याने माणूस ही बदलून जातो. कुत्री गुदामासमोर येतात. अधिक मायावी वाटतात. वासना माणसाला त्याच्यापेक्षा ही हीन बनवते.
अशा अनेक प्रतिकात्मक गोष्टी पाध्ये या कथेत पेरतात. एकूण कथेलाच प्रतिकरूप देऊन मानवी स्वभावाचे गुदाम वाचकासमोर ठेवतात.

सारांश:

पाध्ये यांच्या एकूणच या गटातील कथा विविध वैशिष्ट्यांनी महत्वाच्या आहेत.

स्त्रीला स्वीकारावे लागणारे नामर्द पुरुष आणि त्यामुळे होणारा भावनिक कोंडमारा व्यक्त करत असतानाच पाध्ये नवनैतिकतावादी विचारसरणी घेऊन कथावस्तू मांडतात. यातून स्त्रीवर होणाऱ्या विविध स्वरूपी अन्यायाचे ही ते दर्शन घडवतात.

तसेच प्रतिष्ठा आणि देखावा याखाली चिरडले जाणारे जीवन फक्त आपल्या पारंपारिक नीतिमूल्यांचेच कसे बळी असते याचे ही दर्शन ते घडवतात.

मानवी स्वभावातील बारकावे, गुंतागुंती इत्यादींची तपशीलवार वर्णने पाध्ये यांच्या "या" कथांतून आपल्याला वाचावयास मिळतात.

विवाहबाह्य स्त्री-पुरुष संबंधाच्या कथा:

पाध्ये आपल्या कथेत विविध विषय हाताळतात. तसेच मानवी स्वभावाच्या विविध छटाही कथेच्या माध्यमातून पकडतात. त्यामुळे त्यांच्या कथेत वैविध्य येते. कथा अनेकपदरी होते.

मुंबई शहरात असणारा वेश्या - व्यवसाय व तेथील जनजीवन या बाबत अनेकांनी लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचे दृष्टिकोण वेगवेगळ्या प्रकारचे असलेले दिसतात.

पाध्ये या जीवनाचा विचार इतर लेखकांच्यासारखा करत नाहीत. त्यांनी वेश्याजीवन वेगळ्या पध्दतीने आपल्या कथेत आणलेले आहे.

पाध्ये हे वेश्या म्हणजे वेदनामय जीवन, त्या जीवनावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली पाहिजे इत्यादी प्रचारकी थाटाने या विश्वाकडे पहात नाहीत. त्याही पेक्षा ते गंभीरतेने या जीवनाकडे पहातात.

मुळात वेश्येने देह आणि आत्मा यांची फारकत केलेली असते. तिच्या जाण्यात ही फारकत भिनलेली असते. तिला संसारी बायकांविषयी आसक्ती वाटत असते. ते जीवन तिला हवेहवेसे वाटत असते पण या जीवनातही ती जाण्याचा प्रयत्न करत असते. याचे दर्शन पाध्ये आपल्या कथेत घडवतात.

नागरिक वेश्येकडे का जातो ? याची विविध कारणे सापडतील. पाध्ये आपल्या काही कथांच्यामधून ह्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. कोण रूची पालट म्हणून वेश्येकडे जात असतो, तर कोण सवय म्हणून जात असतो. त्यांच्या या जाण्यात आपण काही वाईट करत आहोत असे मात्र त्यांना वाटत नाही. प्रमाणिकपणे ही माणसे फक्त कुतूहल, चैन, चैज या साठी वेश्येकडे जातात. तर काहीवेळा शारिरीक गरज म्हणून वेश्येकडे जाताना दिसतात. स्वत:चे पुरूषपण दाखवण्यासाठी किंवा दाखवण्याचे ढोंग करण्यासाठी ही माणसे वेश्येकडे जातात.
पाध्ये ही माणसे वास्तवात हे संबंध जसे स्वीकारतात तसेच सरळपणे चित्रित करतात.

वेश्या जीवनाकडे ते स्त्री पुरूष संबंधाचा एक पैलू म्हणून पहातात व तेवढयाच तटस्थपणे त्याचे चित्रण करतात व वेगवेगळ्या भूमिकेतून हे वेश्या - पुरूष संबंध साहित्यात मांडतात. याची प्रचीती आपल्याला त्यांच्या "चलो ना वाली", "तेरी भी चूप मेरी भी चूप" या कथा वाचत असताना येते.

"चलो ना वाली": या कथेत पाध्ये वेश्येला शरीर व आत्म्याची कशी फारकत करावी लागते. तिचे जगणे हे आत्मा नसलेले फक्त शरीर जगणे कसे आहे. याची जाणीव या कथेत देतात. अलका या नव-विवाहित खेड्यातल्या मुलीच्या मनात हे वेश्या प्रकरण कशी उत्सुकता निर्माण करते व शेवटी तिला वेश्या म्हणजे काय ? हे कसे नीटपणे कळते याचे यथार्थ चित्रण या कथेत करतात.

"चलो ना वाली" या कथेची नायिका अलका नुकतेच लग्न होऊन भरत बरोबर धाकू प्रभूच्या चाळीत आलेली असते. लग्नानंतर मित्रांच्या घरी, हॉटेलात जेवणं, चहापाणी, पार्ट्या यात तिच्या वेळ मजेत गेलेला असतो.

धाकू प्रभूच्याच चाळीत तिचं रूटीन जगणं सुरू होतं. या चाळीच्या समोरच निलम मॅन्शन. फक्त एक टेंगेचे अन्तर. या मॅन्शनमध्ये रहाणाऱ्या वेश्या, अलकाला नव्या वाटतात. पहिल्यांदाच त्या मॅन्शनच्या खिडकीत चलो..ना म्हणत पुरूषाच्या गळ्यात हात टाकणाऱ्या बाईची लकब तिला आवडते. इतकी की ती झोपलेल्या नवऱ्यावर चलोनाचा प्रयोग करते. पाध्ये हे वर्णन जीवन्तपणे करतात. कामाच्या रगडा इतका वाढतो की ती अस्वस्थ होते. पण डबा नवऱ्याच्या हातात देता देता ती काल त्याचा मित्र समोरच्या मॅन्शनमध्ये आल्याचे सांगते. भरत त्याचा मित्र-मन्या याचा उध्दार करत अलकाला सांगतो की समोर वेश्या रहातात. ती एवढी निर्व्याज आहे की तिला वेश्या हे प्रकरणच काय आहे हे कळत नाही. इतकी ती अनभिज्ञ आहे.

फक्त तिच्या डोक्यात वेश्या म्हणजे "पैश्यासाठी वाटेल त्या पुरूषा-बरोबर संग करणारी. त्यांना लाज नसते म्हणतात. पण नखरे करण्यात एक्सपर्ट"[२२] या विषयाची एवढीच तिची समज आहे.

पाध्ये अलकाला वाचकासमोर अत्यंत समर्पकपणे आणतात. तिचे निखळ निर्व्याजपण तितक्याच निर्व्याज शैलीत रेखाटतात.
अलकाला मग भरतचा मित्र मन्या याचा पहिल्या दिवशीचा ओळखीचा प्रसंग आठवतो. भरत नसताना आलेला मन्या नस्त्या चौकशा करत होता. अलकाच्या हातीकडे बघण्याचाही चान्स त्याने घेतला होता. त्या प्रसंगाबाबत ती सांगते — "मला मग भीतीच वाटू लागली त्याची. अंगावर काटाच उभा राहयला. समजा याने माझा हात धरला तर काय करू ..? बाप रे.! अब्रूचा प्रश्न आहे आपल्या. आपल्या हातून जरा चूक व्हायची आणि जन्माची भोवायची म्हणून आपण बायकांनी जपले पाहिजे अब्रूला."[२३]
तिच्या मनातले हे विचार तिच्या एकूण जाण्यातली तिची भूमिका दाखवतात.
पण या अल्लड अलकाला समोरचा खिडकीचे आकर्षण असते. कपडे ठेवता ठेवता फक्त आवाज झाला तरी ती त्याकडे पहाते.

ती कपडे ठेवते. उरलेल्या डांबराच्या गोळ्यांनी खेळते. नवरा कामावर गेल्यावर आपण काय करणार ? हा तिचा प्रश्न आहे. सागरगोटया आणण्याचा विचार ती करते.

चार वाजता निलम मॅन्शनच्या त्या खिडकीत क्लो ना.. वाली मिशारी घासत असते. अलकाही मिशारी आणते. खिडकीत बसते.
क्लोना वाली तिच्या अल्लड आणि अनभिज्ञ चेहऱ्यावरून आक्काला म्हणते "ती बाई माझ्याकडे का अशी बघते आहे कुणास ठाऊक ? तिला माझ्या-विषयी काही तरी वाटतंय... बहुधा तिने कधीही रांडा पाहिल्या नसाव्यात ."[२४] आणि ते खरेही असते. त्यामुळेच अलकाच्या मनात तिच्या प्रत्येक कृतीबाबत आकर्षण असते. मिशारी थुंकताना ती अलकाला डोळा घालते. तर अलका ही तिला तसेच उत्तर देते. ती खुश होऊन गोठयाने म्हणते, "मान लिया तुमको – अगर धंदा करती तो बहोत कमाती"[२५]

अलकाला यातील काहीच कळत नाही. पण हळूहळू तिच्याविषयीचे आकर्षण मात्र मनात खोल रुजत जाते. ती तिच्या प्रत्येक कृतीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करु लागली. तिच्या बोलण्याच्या लकबीचा सराव करु लागली. त्यात तिला गम्मत वाटू लागली. ती त्यात अधिकच गुंतत गेली. तिचा तो कार्यक्रमच बनला.

एकदा तिच्या डोक्यात आयडिया येते त्या चलो ना... वालीसारखा मेकप करुन भरतला धक्का द्यावा. ती तसा मेकप करते. गॅलरीत बसते. समोरच्या मॅन्शनकडे जाणारा मन्या मित्राच्या घराकडे सवयीने पहातो तर तिथं धंदेवाली. भरतने जागा बदलली का पहावी म्हणून तो वर येतो. अलका पूर्णत: ट्रान्समध्ये गेलेली. दार उघडते. मन्याला इशारे करु लागते. मन्याला दरदरुन घाम सुटतो. तो उठतो. अलका चलो ना... वालीची वाक्ये बडबडते. मन्याची खात्री पटते ही वेश्याच आहे. तो तिला धरतो. दार बंद करतो. ती भानावर येते तेव्हा मन्याच्या पूर्ण अधीन झालेली असते. तिची तडफड व्यर्थ ठरते. तिच्या डोळ्याला धारा लागतात. मध्यरात्री भरत पिऊन येतो. त्यालाही अलका हवी असते. तो तिला जवळ ओढतो. त्यावेळी तिला वेश्या म्हणजे काय हे नीट समजतं. .1
हे सगळे आशयद्रव्य पाध्येनी अत्यंत कलात्मक मांडणीने या कथेत भरलेले आहे. त्यामुळे ही कथा अनेक दृष्टीने यशस्वी आहे.

अलकाकडे असणारा मोकळा वेळ आणि त्यातून चाळा म्हणून चलो ना.. वालीचे सगळे हावभाव आत्मसाथ करत असते. फक्त वेळ जावा म्हणून. पण तिच्या मनावर त्याची एवढी मोहिनी पडते की ती त्यातच पूर्ण बुडून जाते. स्वत:चे भान हरवते. तिच्या मानसिकतेत ही चलो ना..वाली एवढी रुतते की तिच्या अल्लड मनाला "तिची" प्रत्येक कृती भुरळ घालू लागते. यातूनच तिच्या मनाचे खोळ वाढत जातात. "भरतने एक अस्सल चीज घरात आणली. भरत म्हणायचा आपण अक्कला सांभाळलं पाहिजे.

म्हणून आम्ही घरापासून दूर जायचो. पण भरतने तू आपली बायको आहेस असे भासवून आपल्यासाठी रिजर्व ठेवला होता माल. पण मिळाला की नाही चोर अपने ही अड्डे में"[२६] या मन्याच्या उद्गारातून त्याचाही असा समज होणे पटून जाते.

पाध्ये वेश्येच्या लकबी, वातावरण अत्यंत सहजपणे जिवंत करतात. त्या बरोबरच वेश्या ही एक गरज असे समाज गृहीत धरतो. तिचे जीवन हे वस्तू स्वरुपात स्वीकारतो. मन, आत्मा ह्या गोष्टी तिला नसतात हे गृहीतच धरलेले आहे. तिचे मन आणि शरीर ह्या भिन्न गोष्टी आहेत. हेतू आणि कृती वेगळ्या आहेत. याचा प्रत्यय या कथेत येतो. कथाकार म्हणून पाध्ये यांची सामर्थ्य स्थळे दाखवणारी ही वैशिष्टयपूर्ण कथा आहे.

घरात सुखी असतानाही "चेंज" म्हणून वेश्येकडे जाणाऱ्या माणसाची अनेकांगी चाललेली खोटी धडपड भाऊ पाध्ये "तेरीभी चूप मेरीभी चूप" या कथेत चित्रित करतात. कथेचा नायक रुचिपालट हाच हेतू धरुन वेश्येकडे जातो. पण हे जाणे एका सवयीत रुपान्तरित होते. स्त्री वेश्या जरी असली तरी प्रामाणिकपणा, विश्वसनीयता तिने गमावलेली नसते याचे दर्शन पाध्ये या कथेत घडवतात.

या कथेचा निवेदक - मी, घड्याळ विसरलेला आहे. पण आपण घड्याळ निश्चित कुठे विसरलो आहोत हे मात्र आठवत नाही. आपले घड्याळ विसरले आहे हे तो आपल्या पत्नी-मुलांपासून लपवू शकत नाही. त्याने लपवले आहे एकच - आपण वेश्येकडे जातो.

हा गृहस्थ वेश्येकडे चेंज म्हणून जातो. पण "बकुळा" ही वेश्या त्याच्या पत्नी इतकीच रुटीन झालेली आहे. त्यातही पुन्हा चेंज म्हणून तो दुसऱ्या वेश्येकडे जातो. नवी आळी, नव्या वेश्या पहात. तो शेवटी एका वेश्येकडे जातो. तिथं तिच्या हातात पैसे देणार तोच तिच्या मुलाच्या

रडण्याचा आवाज येतो. त्याचे अशा वेश्येकडे मन लागणे अशक्य, तेथून तो तडक बकुळेकडे जातो. पण आपण बकुळेकडे घड्याळ विसरलो की त्या वेश्येकडे हे त्याला नीट आठवत नाही. तो तडक ऑफिस सुटताच बकुळेकडे जातो व खालच्या मजल्यावर घड्याळ विसरल्याची कबुली देतो. बकुळा त्याला खालच्या मजल्यावर घेऊन जाते. ती गोरी बाई त्याच्या हातात घड्याळ ठेवते. बकुळा काय समजायचे ते समजते. हा घरचा रस्ता धरतो.

घरात येताच हे घड्याळ आपले नाही हे मुलांच्या बोलण्यावरून त्याच्या लक्षात येते. पुन्हा थापा मारून वेळ निभावतो. एवढ्यात गुजराथी गुमास्ता त्याला शोधत घरात येतो. त्याच्या हातात याचे घड्याळ. गुलाबबाईकडून हे घड्याळ मिस्टेकमध्ये तुम्ही घेतलात हे तो बायकोच्या समोर सांगतो. ती ओळखायचे ते ओळखते. गुरख्याच्या हातातले घड्याळ त्याच्या तोंडावर फेकले. ते जमीनीवर पडून फुटते. तेव्हा त्याला आठवले की हे घड्याळ पत्नीच्या भावाने लग्नाच्या वाढदिवसाला दिलेले आहे. संपूर्ण कथेत वेश्येकडे "चेंज" म्हणून जाणारा निवेदक आपण वेश्येकडे जातो हे लपवण्याच्या प्रयत्नात दिसतो. या गडबडीत तो बकुळाशीही प्रामाणिकपणाचे ढोंग करतो व बायकोशीही. त्याची खोटी प्रतिष्ठा उघडी पडते. पाध्ये या कथेतून वेश्या, समाज आणि पुरूष यांचे वेगवेगळे वैशिष्टय या कथेत चित्रित करतात. वेश्या प्रामाणिक आहे. पुरूष बुरखा पांघरणारा आहे. तर समाज बुरख्यालाच प्रतिष्ठा देणारा आहे. या सर्वांचे रसायन पाध्ये फार चांगले कथेत जमवतात.

## सारांश:

पाध्ये स्त्री-पुरूष संबंधाचे चित्रण वेगवेगळ्या पातळ्यांवर करतात. त्यात त्यांची लेखक म्हणून असणारी अनेक वैशिष्टये दिसतात. विवाहित स्त्री जगत असताना तिला वेगळे अस्तित्व उरलेले असतेच असे नाही.

१



या स्त्रियांची चाललेली प्रामाणिकपणे जगण्याची धडपड पाध्ये अत्यंत वैशिष्टयपूर्ण रीतीने दाखवतात.

विविध संस्कारातून, जडणघडणीतून आलेल्या माणसाचे जीवन व त्याचे स्त्री-पुरुष संबंधातील ताण-तणाव पकडण्याइतपतची सुक्ष्म निरीक्षण शक्ती पाध्येना लाभलेली आहे. उच्चवर्गीय विवाहिता, विकृत पुरुष व त्यांच्या बायका, या स्त्री-पुरुष संबंधात वावरणारी हिंसा या साऱ्याचेच पाध्ये समर्थपणे चित्रण करतात.

पाध्ये स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण अत्यंत तटस्थपणे करतात. वर्णनात त्यांच्यातील लेखक समरस होत नाही. त्यामुळे ते वर्णन नैसर्गिक होते. भावना चाळवणारे होत नाही. याबाबत संपूर्ण मराठी कथेत पाध्ये हे एकमेव अपवाद ठरतात.

स्त्री-पुरुष संबंधातील वर्णने ते वास्तवपणे करतात. कल्पनेच्या आहारी जाऊन एखादे वर्णन करण्याची त्यांना गरज भासत नाही. त्यांच्या लेखनाचे आशयद्रव्य ते वास्तवातून उचलतात. त्यामुळे हे शक्य होते. मराठी कथेत स्त्री-पुरुष संबंधाकडे निर्लेपपणे व एक नैसर्गिक व्यवहार म्हणून पहाणारे पाध्ये हे एकमेव लेखक आहेत, असे जाणवते. याबाबतचा अधिक विचार तिसऱ्या प्रकरणात करणार आहोत.

## मुंबईतील अविवाहितांच्या कथा:

अविवाहित मुलींचे जीवन तपशीलासह चित्रण करणाऱ्या साहित्याचे विरळपण सहज लक्षात येण्यासारखे आहे. प्राचीन कालखंडापासून आजतागायत अविवाहित मुलींचे म्हणून एक भावविश्व असते. एखाद्या कलाकृतीचे आशयद्रव्य या भावविश्वात असते. अशा दृष्टीने या भावविश्वाचा विचार मराठीत तुरळक लेखकांनीच केलेला आहे.

विवाह ही स्त्रीच्या जीवनातील फार मोठी घटना समजून व तीच मध्यवर्ती केंद्र मानून भरपूर लेखन झालेले आढळते. याला आपल्या पुराणकथा ही अपवाद नाहीत. याला कारण आपल्या रूढ नैतिकतेत विवाह हा 'संस्कार' मानलेला आहे. हे ही असू शकेल.

पण मुंबईसारख्या महानगरीत जीवन प्रचंड गतीने बदलत चालले आहे. या बरोबरच या अविवाहित मुलींचे ही जीवन तितकेच गतिमान झालेले आहे. त्या जीवनाला स्वत:ची आवर्तने प्राप्त झालेली आहेत. एखादी मुलगी अविवाहित रहाण्याचे धाडस बेलाशक करू शकते. त्यावेळी तिला समाजाची रूढ नैतिकता मान्य नसते. तो तिच्या जाण्याचा स्वतंत्र निर्णय असतो. हे स्वीकारण्या इतपत ही या समाजव्यवस्थेची मनोबैठक बदलत चाललेली दिसते.

त्यामुळे या भावविश्वाचे ताण-तणाव हे नैसर्गिकरीत्या साहित्यात यावेत असे वाटणे यात गैर काही नाही. काही लेखकांनी असे प्रयत्न केलेलेही दिसतात.

या अविवाहितांच्या जीवनाकडे जाणीवपूर्वक पहाण्याचे काम भाऊ पाध्ये यांनी अधिक समर्थपणे केलेले आहे. याची साक्ष आपल्याला त्यांच्या "डोंबा-याचा खेळ", "अग्रेसर" या कादंबरीतून तर मिळतेच, त्याबरोबर "डॉक्टर-कुमारी", "रखडलेली" कुमारी मोहना धारप" या कथेतून पटते. या ठिकाणी त्यांच्या अविवाहित स्त्री-विषयक कथांचा विचार आपण स्वतंत्रपणे करणार आहोत.

पाध्ये अविवाहित स्त्रीच्या जीवनाचा आलेख "डॉक्टर कुमारी" या कथेतून वाचकांसमोर ठेवतात. डॉ. विश्वनाथ या तिच्या बहिणीच्या नव-याचे प्राण वाचवण्यासाठी ती प्रचंड खटपट करते आणि तेथून पुढे तिला असे वाटते की डॉ. विश्वनाथचा प्राण आपल्या शरीरातच वास्तव्य करून आहे. तेव्हापासून तिची लग्नाची इच्छाच नाहीशी होते. कवी सुधाकर तिला मागणी घालूनही ती नकार देते.

मंदा पुसाळकरचा डॉक्टरी व्यवसाय अत्यंत चांगला चाललेला असतो. सुखाची, संपत्तीची तिच्याजवळ कमतरता नाही. लग्न करण्याची इच्छा तिच्या मनात निर्माणही होत नाही. तिने - -लग्नाच्या विचाराला जिरेबंद, कुलूपबंद करून स्मृतीच्या दाट पापुद्र्याखाली पुरून ठेवले होते. आता त्याचे समंधा ही जागे होऊन वर येणार नाही. अशी डॉ. मंदा पुसाळकरने खबरदारी घेतलेली होती" याला कारण आहे डॉ. विश्वनाथचा मृत्यू.

डॉ. विश्वनाथचा मृत्यूनंतर सर्व हॉस्पिटलची जबाबदारी ती पेलते. अशातच कवी सुधारक तिला मागणी घालतो. ती स्पष्ट नकार देते. सुधारकचा हा झालेला अपमान न सहन होऊन तो दवाखान्यातून बाहेर पडतो. त्याला अपघात होतो. त्याला जगवण्यासाठी "ओ" निगेटीव्ह रक्ताची गरज असते. मंदा आपला रक्तगट "ओ" निगेटीव्ह असूनही शांतपणे दवाखान्यातून बाहेर पडते.

पाध्ये ही कथा सरलपणे कोणताही बाज न स्वीकारता कथन करतात. एक रुग्ण वाचवता न आल्याने भ्रम बाळगून जगणारी मंदा दुसरा रुग्ण वाचवता येणे शक्य असतानाही तेथून पळ काढते. हा विचार वाचकाला अस्वस्थ करतो.

अशीच पाध्ये यांची "खडलेली" ही कथा कुमुद नावाच्याखडलेल्या मुलीची जीवनकथा वाचकासमोर ठेवते. अत्यंत चांगली, ठसठसीत चेहऱ्याची, बोलणे पुरुषासारखे असणारी कुमुद अत्यंत बिनधास्त आहे. पुरुषांचा खिमा करण्याची संधी ती दवडत नाही. तरीही आकर्षक वाटायची. त्यामुळे निवेदक बापू तिचा पाठलाग करत असतो.

कुमुदची स्वतःच्या जोडीदाराविषयी काही ठाम मते आहेत. तिने अनेकांना नकार दिलेला आहे. कुणाला सिगरेट ओढतो म्हणून तर कोणाला विजार घालतो म्हणून. तर कोण अन्य कारणाने पुरुष वाटत नाही

म्हणून. पण बापूचे मात्र एकांगी प्रेमप्रकरण चालूच असते. हे घरात पसरते. अचानक त्याची पत्नी मरते. आणि बापूची बहिण कुमुदला मागणी घालते. तेव्हा ती पुन्हा स्पष्ट नकार देते आणि कथा संपते.
पाध्ये कुमुदला शेवटपर्यंत कुमुदला कणखर ठेवतात. रुढ स्त्री दृष्टिकोणाला तिच्या माध्यमातून तडा देतात. तडजोडन करता स्त्री जगू शकते हे या कथेतून दाखवतात.

"कुमारी मोहना धारप" पाध्यांची आशीच एक कथा आहे. कथेची नायिका कुमारी मोहना धारप बी.अे.,एम्.अेड्. वय वर्षे अडतीस. गेली तेरा वर्षे स्टाफरूममध्ये साडेचार वाजता थर्मासमधून आणलेला चहा पिते. आपल्या भावना आवरण्याचा प्रयत्न करते.
एवढे वय होऊनही ती सौंदर्याबाबत दक्ष आहे. लग्न म्हणजे एका पुरुषाशी जन्मभर संबंध. ही संकल्पना तिला मान्य नाही. त्याचा तिला किळस वाटतो.
पण ~~तिला~~ आपल्याला काही तरी हवं आहे असं तिला सारखं वाटू लागतं. अशातच सुधीर कर्णिक हा १२-१३ वर्षांचा मुलगा स्टाफरूममध्ये येतो. ती त्याला जवळ घेते. ती त्याला स्वत:शी कुस्करून टाकू लागते. त्याच्या विजारीची बटणे शोधू लागते. एवढ्यात घंटा होते. तिच्या टाळक्यात घाण कोसळतात. ती भानावर येते. या छोटेखानी कथेत पाध्ये मोहना धारप या कोंडलेल्या शरीराचा ज्वालामुखी उद्रेक अत्यंत ताकदीने उभा करतात. यात उथळपणा येत नाही. सहजपणे एका नैसर्गिक उफाळण्याची कथा ते निर्लेपपणे साकार करतात.

वय, शरीर आणि मन यांचा विचार अत्यंत सखोलपणे करून कोणत्याही प्रलोभनात आपला समतोल ढळू न देता एक चांगली कथा ते घडवतात.

सारांश:

या तीनही कथांतून भाऊ पाध्ये यांनी अविवाहित मुलींच्या जीवनातील ताण-तणाव, त्यांची मानसिकता त्यांचे म्हणून असणारे प्रश्न समर्थपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.
अविवाहितांकडे समाज कसा पाहतो, त्यांचे जगणे कसे आहे याचे तपशीलासह पाध्ये वर्णन करतात. जगण्यातील अंत:प्रेरणा किती महत्त्वाची आहे हे दाखवून देतात.
या कथा थोडया पसरट व हालगर्जीपणे साकारल्यामुळे काही दोष निर्माण झालेले आहेत. याची चर्चा आपण तिसऱ्या प्रकरणात करणार आहोत.

महानगरीय कामगार जीवनाची कथा:

भाऊ पाध्ये यांच्या लेखनापाठीमागे लेखक म्हणून त्यांची निश्चित अशी एक भूमिका आहे. त्यामुळेच त्यांच्या लेखनामध्ये वैविध्य आणि वास्तवता आलेली आहे. पाध्ये स्त्री-पुरुष संबंधाच्या कथा जितक्या समर्थपणे लिहितात तितक्याच समर्थपणे मनोविकृती पूर्ण माणसांच्या, चाळीतल्या विश्वाच्या, एखाद्या संगीतप्रेमी माणसाच्या जीवनाचाही ते कथेसाठी उपयोग करुन घेतात. पाध्ये यांच्या लेखनीला कोणताही विषय वर्ज्य नाही. आशयद्रव्यांची विविध क्षेत्रे ते आपल्या कथांसाठी निवडतात व त्यांना योग्य कलात्मक रुप देतात.

मुंबई शहर हे कामगारांनी व्यापलेले शहर आहे. विविध भूप्रदेशातून आपलेले कामगार येथे पोटासाठी विविध व्यवसाय स्वीकारत असतात. कामगारांच्या बहुसंख्य वस्तीतूनच मध्यमवर्गीय चाळ संस्कृती निर्माण झाली. या शहरातच कामगारचळवळीचा जन्म झाला. पहिल्यांदा ही कामगार चळवळ मालक विरुध्द कामगार असा संघर्ष करत गेली. नंतरच्या कालावधीत या कामगार चळवळीतच परिस्थितीनुरुप गटतट पडत गेले. कामगारांचे हित या

पेक्षा सत्तेचे राजकारण, म्हणण्यापेक्षा नेतेपदासाठीचे राजकारण सुरु झाले. यातूनच भांडणे - मारामाऱ्या, खून यांचे विषारी सत्र कामगार चळवळीत घुसले. परिणाम सामान्य कामगारांच्या जीवनावर झाला.

कामगार चळवळ हा ही पाध्ये यांच्या चिंतनाचा विषय. मुळातच पाध्ये यांचा पिंड राजकीय चळवळीबद्दल आस्था असणारा. त्यामुळे ते आपल्या तारुण्याच्या कालखंडात विविध चळवळीत सामील झालेले आहेत. क्रियाशील कार्यकर्ते म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. राष्ट्रसेवादलात घडलेले पाध्ये यांचे व्यक्तिमत्व असल्यामुळे समाजवादी विचारांच्या प्रभावाखाली त्यांचे राजकीय विचार आकारत गेलेले दिसतात. त्यामुळे कोणत्याही चळवळीकडे ते असेच ओढले जातात. कामगार चळवळीकडे ही ते असेच ओढले गेलेले आहेत. त्यांच्या कादंबऱ्यातून हा विषय त्यांनी खूपच ताकदीने हाताळलेला आहे. ते एखाद्या कामगार चळवळीतील संघर्षाला जेव्हा कथेसाठी निवडतात तेव्हा "एक सुन्हेरा ख्वाबसारखी" कथा जन्माला येते.

"एक सुन्हेरा ख्वाब": या कथेत महानगरीय कामगार चळवळीचे विषारी राजकारण आणि या राजकारणाला बळी पडणारे "बेंडया"सारखे सामान्य कामगार यांच्या जीवनाबरोबरच या कामगारांचे हेवेदावे, मारामाऱ्या, खून या बरोबरच या कामगारांच्या वाटयाला येणारा तुरुंग, कोर्ट आणि दवाखाना येथील अनुभवाच्यामिश्रणातून हे कथाशिल्प उभा रहाते.

कथेची सुरुवात बेंडया या कामगाराने आपल्या सहकाऱ्याच्या मदतीने बोरसे या कामगार पुढाऱ्याचा खून केल्यामुळे पोलीस त्याच्या शोधात घरी येण्याने होते. कथेचे निवेदन स्वत: बेंडयाने केलेले असल्यामुळे सिताबीन, नरस्या

आणि इबू यांच्या मदतीने आपण बोरस्याच्या पोटात कसा रामपूरी खुपसून दिला याचे वर्णन तो करतो.

बंड्या इतका बिनधास्त आहे की त्याचे स्वैर जगणे कशाचीच फिकर करणारे नाही. त्याच्या जगण्याविषयीच्या कल्पना ही भयावह आहेत, त्याच्यासारखा पत्थरदिल माणूस सापडणे कठीण. पण त्याच्याही मनात असा एक कोपरा आहे की जिथं त्याच्या अक्काचं वास्तव्य आहे. ती एकटीच नात्याचा दुवा म्हणून शिल्लक असल्यामुळे तो सतत अक्काच्या मायेनं भारावून जातो. अक्कालाही फक्त बंड्याचाच आधार असल्यामुळे ती त्याच्यावर अमाप माया करत असते.

बंड्याला तुरुंगात नेल्यानंतर, बंड्याच्या माध्यमातून भाऊ पाध्ये तुरुंगाचे सगळे वातावरण कथेत जीवन्त करतात. बंड्या सततचा पोलीस कोठडीचा वरकरी असल्यामुळे त्याला तुरुंगातल्या वातावरणात काहीच नवीन वाटत नाही. त्याने माझगाव पासून अंधेरीपर्यंतच्या सगळ्या कोठड्या अनुभवल्या आहेत. त्यामुळे कोठडीत तो आल्या आल्या सुखासोयी न्याहाळू लागतो. बरेच दिवस कोठडीत काढायचे असल्यामुळे स्वत:च्याच मनात विविध प्लॅन सुरु होतात.
एकदाची कोर्टासमोर हजेरी झाली की जरा समाधानाचे दिवस येणार असतात . बंड्या तुरुंगाच्या वातावरणाला इतका सरावलेला आहे की साहेब जुलाब केव्हा पाडणार, हवालदाराला कसे गंडवायचे या सगळ्या व्यवहारात तो तरबेज असतो. एकूण त्याच्या मनात तुरुंग नावाच्या प्रकाराची भीती तीळमात्राही नाही.

बंड्या एकदा हवालदारची वाट पहात असतानाच आतल्या पब्लिकमधून कातर पण काळजाचा ठाव घेणारा आवाज घुमतो "एक सुन्हेरा ख्वाब है दुनिया, निंदसे मारेजा... आग लगी है आग.."

कैदी एकटाच हे गाणे गुणगुणत असतो. पण हा आवाज ऐकताच त्याच्या काळजाची जखम वाहू लागते. ती एक गहरी चोट असते. तवायफ गुलाबशी बंड्याचा प्रेमभंग झाला आहे हे त्याच्या जिंदगीचे मोठे दु:ख. या आवाजानं अस्वस्थ झालेला बंड्या हा खूनी बंड्या पेक्षा हळवा, भावनाशील आणि लाघवी वाटतो.

गुन्हेगार म्हणून वाळीत टाकलेल्या माणसाच्या जीवनात ही सामान्य माणसासारख्या भावनांना जागा असते. ती ही जीवन संवेदनपणे जगत असतात. याचे मनोज्ञ दर्शन पाध्ये या प्रसंगातून घडवतात.

जोगदंड साहेब या मर्डर केसमधल्या तिघाही आरोपींची पिंडी पाडतो. बंड्याच्या पोटात तर असा दंडुका खुपसतो की सकाळी बंड्याची चड्डी रक्ताने लालेलाल. त्यामुळे जोगदंड साहेब टरकतो. बंड्याची खाजगी हॉस्पिटलमध्ये रवानगी होते. बंड्याला बरे दिवस येतात. पण अचानक एकेदिवशी त्याला अक्काची इतकी आठवण येते की त्या दिवशी तो धायमोकलून रडतो. जिंदगीत असा कधी तो रडला नव्हता. येथे पाध्ये भावनिक पोकळी निर्माण झालेल्या माणसाच्या अंतरंगाचा तडफडात खुपच कौशल्याने रंगवतात.

काही दिवसातच बंड्याला अक्कानं नव-याचा मार खाऊन स्वत:ला पेटवून घेतल्याचं समजतं आणि बंड्याच्या लक्षात येतं की आपण त्या दिवशी इतकं का रडलो होतो. बंड्याला आता कोणीच नात्यातलं उरलं नव्हतं. सर्वार्थानेच त्याच्या जिंदगीचा पतंग आता वा-यावर सुटला होता.

हॉस्पिटलमधून बंड्याची रवानगी पुन्हा कोठडीत होते तेव्हा गोंधळेकर साहेबांचा मुलगा अनिल, आणिबाणी विरुद्ध चळवळ करून यांच्या कोठडीत येतो आणि या सगळ्यांचा दिनक्रमच बदलून जातो. अनिलला

आणिबाणीमुळे देशाचाच तुरुंग झाला आहे हे खपत नाही. इंदिरा गांधी कोण समजते स्वत:ला ? हा त्याला पडलेला महत्त्वाचा प्रश्न आहे. अनिलमुळे बंडया पेपर वाचू लागतो. त्याच्याबरोबर राजकीय चर्चा, वितंडवाद घालू लागतो. त्याला अनिलची सगळी मतं पटू लागतात. तो ही त्याच्या चळवळीच्या विचारांना पाठींबा देतो आणि अनिलला वचन देतो की -- "आपण बाहेर आल्यावर काहीतरी करू" अनिल शिक्षा संपवून बाहेर पडला. लगेचच कुठल्या चळवळीत भाग घेऊन त्याला पुन्हा शिक्षा होते. असे पत्र बंडयाला येते. बंडया म्हणतो, एकूण त्याला मी बाहेर येईपर्यंतही धीर नव्हता.

पाध्ये यांची ही कथा खूपच मोठा आवाका असलेली कथा आहे. या कथेत पाध्ये कामगार चळवळीतील तपशील देतात. हे तपशील सामान्य कामगारांच्या जीवनाशी चळवळीचे नेते कसे खेळत असतात याचे विश्लेषण करतात. सामान्य कामगार ही भावनेच्या आहारी जाऊन कोणत्याही टोकाच्या निर्णयाला सहज येतात व आपली जिंदगी बरबाद करून घेतात. याचे चित्र पाध्ये या कथेत रंगवतात. त्या बरोबरच तुरुंगातले पूर्ण जीवन ते शब्दांकित करतात.

फक्त तुरुंग आणि तेथील जनजीवन, वातावरण याचे दर्शन घडवणारी "जेलबर्ड" सारखी कादंबरी लिहिणारे पाध्ये "एक सुन्हेरा ख्वाॅब" या कथेतही हे वातावरण जीवन्त करतात. वाचकाच्या समोर संपूर्ण तुरुंग उभा करतात. इतके वास्तवाचे तपशील पाध्ये या कथेत परिश्रम पूर्वक पेरतात.

गुन्हेगार हा ही माणूस असतो . सामान्य माणसासारख्याच त्याच्या भावना असतात. त्यालाही आपलं कोणीतरी आहे, असावं किंवा होतं असं वाटत असतं. त्याच्याही पापणीच्या कडा ओलावता असतात. पण त्याच्याकडे आत्मीयतेने पहणारा वर्ग अत्यल्प असतो. याचे परिणामकारक वर्णन पाध्ये या कथेत करतात.

धंदेवाईक गुन्हेगाराचा सराईतपणा, त्याच्या जगण्याचा बिनधास्तपणा पाध्ये तपशीलासहीत चित्राण करतात. यातून मुंबईतील गुन्हेगार जगताचे चित्रा आपल्यासमोर उभा रहाते. बोरसेचा खून आणि त्यासाठी बंड्याने लढवलेल्या आयडिया या आजच्या मुंबईतील गुन्हेगार जमातीचे मानसशास्त्रा दर्शविण्यास पुरेशा आहेत. इतक्या विचारपूर्वक पाध्ये यांनी या कथेत चपखल बसवल्या आहेत.

अनिल आल्यानंतर ज्या राजकीय चर्चा घडतात. मतप्रदर्शित होतात. या सा-यातून देश आणि देशाचे राजकारण यातच आणिबाणी ह्या सा-या गोष्टी पाध्ये यांच्या समाजवादी विचारसरणीच्या निदर्शक आहेत पण पाध्ये कोठेही आपल्या ह्या विचारपध्दती आहेत असा प्रचारकी थाट करत नाहीत.

बंड्या – अक्का – तिचं मरण – तवायफ – तिची गझल – तुरूंग – अनिल – त्याची राजकीय मतं यांचं एक जोरकस रसायन पाध्ये या कथेत जमवतात. ज्याचा परिणाम म्हणून वाचक सुन्न होतो हेच या कथेचे यश.

## राजकीय जीवन वास्तवाच्या कथा:

कामगार विश्वाइतकेच किंबहुना अधिक गुंतागुंतीचे आणि ताणतणावांचे विश्व म्हणजे राजकारण होय. जीवघेणे संघर्ष, सत्तेचे चढउतार आणि किडत-सडत जाणा-या राजकीय मनोवृत्ती यामुळे हे विश्व नेहमीच गजबजाटाचे असते. पहिल्यांदा सामान्य माणसाला या क्षेत्राची नेहमीच भुरळ असते. त्याच्याकडे तो स्वाभाविकपणे आकर्षिला जातो आणि एकदा का त्या जीवनात तो गुंतला की त्याला त्या जीवनाची नशा चढू लागते आणि त्यातून तो कधी बाहेरच पडू शकत नाही. या विश्वात गुंतलेल्या माणसातील माणूस केव्हा संपतो हे त्याचं त्यालाही कळत नाही.

सत्ता आणि खुर्ची यांची नशा चढवणारे हे जीवन साहित्यात वेगवेगळया लेखकांनी वेगवेगळया प्रकारे रेखाटले आहे. राजकारणाची ही सर्वप्रियता आपल्याकडे लोकशाहीमुळे आली. लोकशाहीमुळे आपला देश पुढे जाणार असे आपल्या सर्वच विचारवंताना नेहमीच वाटत आलेलं आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजना ही देशाला प्रगतीकडे नेत आहे असा निदान त्या त्या राज्यकर्त्यांचा समज आहे. पण वास्तव मात्र भयावह आहे.

ही सगळी राजकीय अवस्था भाऊ पाध्ये यांच्या चिंतनशीलतेचा विषय आहे. या ना त्या कारणाने त्यांचा या जीवनाशी निकटचा संबंध आहे. त्यामुळे हे राजकीय जीवन हे ही त्यांच्या कथेचा विषय होते. व "देशभक्त काका", "देश पुढे गेला" यासारख्या कथा जन्माला येतात.

"<u>स्व. देशभक्त काका</u>": या कथेत पाध्ये एका राजकीय कार्यकर्त्याचे माणसांनी कधीकाळी गजबजलेले व नंतर ओसाड पडलेले असे आयुष्य चित्रित करतात. हे जीवन स्वातंत्र्यापूर्वी संस्कारित झाल्यामुळे ध्येयवाद, आदर्शवाद वगैरे जोपासणारे आहे. पण ही मूल्येच राजकारणातून उठल्यानंतर स्व. देशभक्तकाकांचे आयुष्य कसे गेले याचा तपशील ते या कथेत मांडतात.

या स्वदेशभक्त काकांनी भायकळा कॉंग्रेस कमिटीच्या ऑफिसमध्ये आपली हयात घालवली. त्यावेळी कॉंग्रेसची सत्ता असल्याने आणि काकांचे राजकीय पक्षात वजन असल्यामुळे हे भायकळा कॉंग्रेस कमिटीचे कार्यालय सतत माणसांनी खचाखच भरलेले असायचे. काका माणसांच्या गराड्यात लोकनेत्यासारखे फिरत असताना सुखावायचे. त्यांना आपल्या राजकीय नेतेपदाचा अभिमान वाटायचा.

१९७७ साली कॉंग्रेस सत्तेवरून खाली आली. भायखळा कॉंग्रेस कार्यालय ओस पडले. सततची गर्दी आता दिसेनाशी झाली. काका अस्वस्थ होऊ लागले.

त्यांना गर्दीची झालेली सवय. गप्पांची पडलेली भीड. आता अनुभवास येईनासी झाली. ते अस्वस्थ झाले. त्यांना गप्पा मारण्यासाठी फक्त एक फाटका कवी भेटला. तोच त्यांच्याबरोबर गप्पा मारु लागला. काका शेवटी पक्षांतर करतात.

जनता पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवतात. निवडणूकीत सपशेल पराभव पत्करतात. त्यांना अखेरचे दिवस राजकीय बनवासासारखे येतात. ज्यांनी ज्यांनी त्यांच्याकडून वारेमाप फायदा घेतला, ज्यांचे त्या काळात जीव्हाळ्याचे स्नेहबंध होते त्यापैकी कोणीच त्यांच्याकडे फिरकत नसते. काय म्हणायला कवीने तेवढाच आपला सातत्यपूर्ण कार्यक्रम चालू ठेवलेला होता. काकांना मरतेवेळी आपल्या नातेवाईकांपेक्षा कवीच अधिक जवळचा वाटतो. ते त्याचे नाव घेतच प्राण सोडतात. कारण कवी त्यांच्याकडे कधी स्वार्था-साठी आला नव्हता. त्याचा कोणताही फायदा नव्हता, तरीही तो माणूस म्हणून काकांच्याकडे यायचा. त्यांच्यातला माणूस काकाला अधिक प्रिय झाला होता.

हे सर्वच ताण-तणाव, वर्तन-परिवर्तन पाध्ये अत्यंत सूक्ष्मपणे व परिणामकारकरित्या दाखवतात.

ही कथा राजकारणातील भल्या-बुऱ्या प्रवृत्ती स्वार्थप्रवण माणसं आणि त्यांच्या राजकारणातील तात्त्विक कोलांटया या सगळ्याचेच समर्पक वर्णन करता करता ते राजकीय तत्वज्ञानातील भोंदूव्यवस्था वाचकांच्यासमोर ठेवतात. हेच या कथेचे वेगळे वैशिष्ठय आहे.
पाध्ये यात लेखक म्हणून स्वत:च्या राजकीय मतप्रणालीचा कुठेही वास येऊ देत नाहीत. फक्त तटस्थपणे राजकीय तपशील पेरुन जे आपल्याला सांगायचे आहे ते ही साधतात व कथा यशस्वी करतात.

"देश पुढे गेला": ही भाऊ पाध्ये यांची कथा त्यांच्या लेखनाची आणखी वेगवेगळे पैलू दाखविते. ही कल्पना म्हणजे कलावन्त मनाची स्वैर भटकन्ती आहे . "चलनवाढ" हा आपल्याला फारसा गंभीर न वाटणारा असा भाग. पैशाच्या घसरणाऱ्या मूल्याबाबत आपल्याला विचार करायला सवड नाही. आपले मध्यमवर्गीय संस्कार हेच आपल्या जगण्याचे इतिकर्तव्य अशा अवस्थेत भाऊ पाध्ये यांची ही कथा वाचकाला धक्का देते.

या कथेचा निवेदक भाऊ १५ वर्षे जपानला राहून भारतात पर्यायाने मुंबईत आल्यानंतर त्याला सारे चित्रच पालटलेले दिसते. साध्या चहाच्या कपाला दीडशेहे ते दोनशेहे रुपये, कोको कोला ३०० रु. हे पाहिल्यानंतर भाऊ आवाक होऊन जातो. येथे प्रत्येक माणसांजवळ नोटांसाठी ब्रीफकेस बघीत-ल्यानंतर त्याला धसका बसतो. हा सगळा व्यवहाराच त्याला नवीन वाटू लागतो.

त्याला दिसते - मुंबई आता बदलली आहे. टोकिओ शहरासारखी मुंबईत फारसी वर्दळ नाही. गोंगाट नाही. सगळीकडे गगनचुंबी इमारती. त्यावर भाड्याने देणे आहे अशा पाटया. हे सगळंच त्याला नवंनवं वाटू लागतं. त्याची पनामा, बरकली, विल्स सिगार तर आऊट ऑफ स्टॉक. तो त्याच्या फ्लॅटवर येतो तर तिथे शेजारी कुणीच नाही. दादरसारख्या गर्दीच्या ठिकाणी ही माणसाचा शुकशुकाट असतो. हे बघीतल्यावर तर भाऊ गारच होतो.

येथे गॅस, वीज, घासलेट या वस्तू आता निकामी होत चालल्या आहेत. भाऊची बायको भाऊला म्हणते - "तुम्हालाकपडे ठेवायची आहेत ना तर या फ्रीजमध्ये ठेवा" हे ऐकल्यावर भाऊ गरगरतोच. मुंबईचं हे बदलतं रूप त्याला असह्य होऊ लागतं. पाध्ये आपल्या स्वैर कल्पनेच्या आधारे आजच्या प्रत्येक घडामोडीचा जीवन व्यवहाराचा या कथेत उपहास करतात.

भाऊला लग्नाच्या वाढदिवशी काही हवं असतं तर भजी, कटलेट हे पदार्थ त्याला इतिहासजमा झाल्याचे आढळते. काही त्याच्याकाळचे पदार्थ मिळण्याचे ठिकाण समुद्रकिनारी कोळ्याच्या वस्तीत आहे हे समजल्यावर तो तेथे जातो तर कोळी त्याला नोटांच्या बंडलाऐवजी टी.व्ही., रेडिओ, फ्रिज अशा वस्तू मोडक्या बाजारासाठी आणलेत का असे विचारतो. भाऊ पुन्हा सैरभैर होतो.

भाऊ विजयच्या सांगण्यावरून आणि सुधाकरच्या बोलावण्यावरून सुधाकरच्या वस्तीवर जातो. कर्जतपासून पुढे उल्हासनदीच्या काठी त्याला मुंबईतील मध्यमवर्गीय भिकार बनून रहायला आलेले दिसतात. पण त्यांच्या मध्यमवर्गीय विचारसरणीत कोणताच बदल झालेला नसतो. आज त्यांच्यावर मात्र हालाखीची परिस्थिती आली होती. कारण महिन्याला येणाऱ्या नोटात त्यांचे काहीच भागत नव्हतं. तो सुधाकरशी बोलतो तेव्हा त्याला आढळते की - सुधाकरच्या बोलण्यात संस्कृती, नैतिकता, मूल्य, परंपरा इ. पूर्वीचे भेकस शब्द जसेच्या तसे आहेत. त्यात कोणताच फरक पडलेला नाही. भाऊला आश्चर्य वाटतं की एवढी विपन्न अवस्था येऊनही ही माणसं बदलत नाहीत, पेटून उठत नाहीत. हे का ? यावर त्याला त्याचं मध्यमवर्गीय वांझोटेपण, हेच उत्तर सापडतं.

मध्यमवर्गीयांच्या दृष्टीने असंस्कृत असणाऱ्या डॉनच्या वस्तीवर तो पोहचतो. येथे सगळ्यांची डोकी भडकलेली. सरकार या भांडवलदारांची पाठराखण करते आहे. भांडवलदार वस्तूवरची आपली मालकी रहावी म्हणून किमती वाढवत आहेत. हा एक धूर्त डाव असून हा उधळला पाहिजे. यासाठी हे लोक एक राजकीय पवित्रा म्हणून ~~हे लोक~~ मुंबईतल्या स्क्रू पासून ते गिरणीतल्या मशीन साच्यापर्यंत वस्तू चोरु लागतात. सरकार या प्रकाराने अस्वस्थ होते. पहारे वाढवले जातात आणि या लोकांवर पोलीस गोळीबाराच्या फैरी झाडतात. डॉनचे लोक पटापट पडू लागतात.

भाऊ म्हणतो - "देश पुढे गेला तरी गोळीबार आहे तसाच आहे".
एवढा लक्षणीय आशय असणारी ही कथा अनेकार्थाने लक्षणीय आहे.
मुंबईच्या विश्वात स्वत:ची मध्यमवर्गीय संस्कृती टिकवण्यासाठी जीवाचा
आटापीटा करणारी माणसे त्याच त्या बुरसटलेल्या मूल्यसंकल्पना उराशी
कवटाळून जगत रहातात. जे जगणे अनावश्यक व अर्थहीन आहे. पाध्ये त्या
माणसांचा आणि त्यांच्या मनोवृत्तीच उपहासपूर्ण उल्लेख करतात.
मुंबई आणि रेल्वे हे एक समीकरण. मुंबई आणि गर्दी यांचा संबंध ही
अन्योन्य आहे. यांचा उपयोग पाध्ये उपहासात्मक थट्टेसाठी करतात.
रेल्वेला तिसरा वर्ग नाही. सगळे मुंग्या असल्यासारखे रेल्वेला डसतात.
मात्र डब्यात कोणीच नाही. सगळे स्टेशन रिकामे. ही पाध्ये यानी
केलेली वर्णने त्यांच्या शैलीचा अनोखा प्रत्यय देतात.

डॉनच्या व्यक्तिरेखेमार्फत ते तात्त्विक भूमिका घेऊन संपूर्ण भारतीय
अर्थव्यवस्थेचे विश्लेषन करतात. या बरोबरच डॉनच्या गँग मार्फत सामान्य
माणसातला एक जीवंत वर्ग जो लढवय्या आहे त्याचे मनोज्ञ दर्शन घडवतात.
ही माणसं विरोध करणे. त्यात मरण आलं तरी मरणे ह्या गोष्टी सहज
स्वीकारतात. कारण त्यांना प्रवाहाच्या विरुद्द पोहून सवय असते.

सरकार आणि भांडवलदार यांनी भारतीय अर्थव्यवस्था कशी
पोखरली आहे याचेही उपहासपूर्ण चित्र ते उभे करतात. त्यांची थट्टा
उडवतात पण वाचकाला मात्र गंभीर करतात.

या कथेतील देश पुढे नेण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या पंचवार्षिक
योजनेचे उपहासगर्भ विश्लेषन पाध्येची राजकीय नैतिकता आणि त्यांची
एकूण समाजवादी वैचारिक भूमिका स्पष्ट करण्यास उपयोगी पडते. त्याचे
लेखक म्हणून अनेक पैलू दाखवणारी ही एक लक्षणीय कथा आहे. हे
मात्र निश्चित.

सारांश:

पाध्ये यांच्या सर्व कथांच्या आशयसूत्रांचा विचार केल्यानंतर आपल्याला त्यांच्या लेखनाची विविध वैशिष्टये आढळून येतात.

मुंबई सारख्या महानगरीत विश्वभराचे अनुभव माणसाला घ्यावे लागतात. या महानगरीत स्त्री जीवनाचे विविध नमुने, त्यांच्या समस्या, होणारे अन्याय या सर्वांचेच चित्र पाध्ये यांनी समर्थपणे केले आहे. या नगरीतल्या स्त्री-पुरुष संबंधाचे वास्तवचित्रण पाध्ये आपल्या कथेत करतात. मुळात पाध्ये स्त्री-पुरुष संबंधाकडे सहजपणे, व्यवहार म्हणून पहातात. ते स्त्री-पुरुष संबंधातील सर्व ताण-तणाव पकडतात. त्यामुळे त्यांच्या कथेत वैविध्य येते. त्यांनी खालील प्रकारचे स्त्री-पुरुष संबंध आपल्या कथेत चित्रित केलेले आहे.१)"विवाहित स्त्री म्हणून जगत असताना स्वत:चे असे वेगळे अस्तित्व उरतेच असे नाही. तिचे अस्तित्व ब-याचवेळा ती गमावून बसलेली असते. यातून ही स्वत:ला शोधण्याचा स्वत:चे अस्तित्व जपण्याचा तिचा प्रयत्न चाललेला असतो. सामान्य विवाहित स्त्री म्हणून आपण प्रामाणिकपणे, सच्चेपणाने जगावे यासाठी तिची धडपड चाललेली असते. अशा स्त्रियांच्या जीवनातील विविध समस्या पाध्यांनी "संकेत मिलनाचा", "ठेच", "साप", "टॉयलेट", "थोडीसी जो पीली" या कथांमधून यथार्थपणे चित्रित केलेल्या आहेत. यातील प्रत्येक कथा नवा प्रश्न मांडते. नवे प्रश्न वाचकांसमोर आणते. त्यामुळे या कथा यशस्वी होतात.

२) मुंबई नगरीत विविध थरातील लोक जसे दिसतात, तसेच विविध भागातून आलेले लोक आढळतात. यांची मानसिकता त्या विभागातल्या वातावरणातून, संस्कृतीतून संस्कारित झालेली असते. त्यांचा मन:पिंड वेगवेगळ्या संस्कारांमुळे विविध प्रवृत्ती पोसताना दिसतो. या विशिष्ट

मानसिकतेमुळेही पुरुष स्त्रीवर अन्याय करत असतो. त्यामुळे होणाऱ्या शोकान्तिकेचे दर्शन पाध्यांची कथा घडवते. अशा स्त्रियांचे चित्रण आपल्याला "पायातला बूट", "बायका खाणारी माणसं", "बगीचा", "पोल्ट्री फार्मिंग", "अनुभव" या कथांमधून वाचावयास मिळतात.

३) पाध्ये यांच्या काही कथातून उच्चवर्गीय विवाहितांचे जीवन तपशीलांने चित्रित केल्याचे दिसते. या उच्चवर्गीय जीवनात सामान्य अथवा मध्यमवर्गीयांपेक्षा भिन्न स्वरूपाच्या समस्या असतात. उच्चवर्गीय विवाहितांच्या समस्या ह्या सामान्य अथवा मध्यमवर्गीय स्त्रीपेक्षा भिन्न असतात. या स्त्रिया चारचौघींसारख्या जीवन व्यतीत करणाऱ्या नाहीत. त्यांच्याजवळ अमाप संपत्ती आहे. समाजात प्रतिष्टा आहे. पण ज्यांचा भावनिक कोंडमारा झाल्यामुळे, त्यांच्या वैवाहिक जीवनात अडथळा निर्माण झाल्यामुळे त्यांनी जगण्याच्या वेगवेगळ्या वाटा शोधलेल्या आहेत. अशा स्त्रियांचे विश्व "वसुंधरा", "थिएटर", "थालीपीठ", "कुटुंब" या कथांतून मांडलेले आहे. या कथातून ते लैंगिक व्यवहाराकडे एक व्यवहार म्हणून पहातात याचा प्रत्यय येतो.

४) प्रत्येक विवाहितेच्या पदरी पडलेला पती हा त्या स्त्रीच्या योग्यतेचा किंवा मनासारखा असेलच असे नाही. अनेकवेळा अपेक्षाभंगाचे दुःख पदरी पडत असते. बरेच संसार हे फक्त तडजोडीवर किंवा संस्कृतीच्या नावावर चाललेले असतात. काही वेळा तर हा पुरुष फक्त कुंकवाचा धनी उरतो. त्यावेळी त्या स्त्रीच्या वाटयाला येणारे दुःख हे विविधांगी असते. नामर्दपतीमुळे होणारी शारीरिक तडफड, मानसिक कोंडमारा, समाजातील हेटाळणी यातून शोधलेली किंवा शोधावी लागलेली नवीन वाट, यामुळे त्या स्त्रीच्या वाटयाला काय येते ? याचे वास्तव व परिणामकारक चित्रण "नवरा", "अक्करमाशा", "गुदाम", "पडदा", या कथांतून सापडते.

५) पाध्ये स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण करत असताना असाहयपणे एखादया मनोविकृत पुरुषाच्या तावडीत सापडलेल्या स्त्रीचेही समर्थपणे चित्रित करतात. या ठिकाणी स्त्रीचे मूल्य "वस्तू" एवढेच उरते. "मुरगी", "फाईव्ह गार्डन" या पाध्यांच्या कथा असा प्रकारच्या स्त्री-पुरुष संबंधाचे सूक्ष्म तपशीलांसह व वास्तव असे चित्रण करतात.

६) प्रत्येक महानगरात आज विवाहबाह्य संबंधाने वेगवेगळे रूप धारण केलेले आहे. याबाबत वेगवेगळे मतप्रवाह निर्माण व्हावेत एवढीही गोष्ट सार्वजनिक झालेली आहे. मुंबई शहरात वेश्या व्यवसाय आणि सामान्य जनजीवन यातही गुंतागुंती निर्माण झालेल्या दिसतात. पाध्यांच्या कथातून येणारे वेश्याजीवन हे मुद्दाम कळवळा म्हणून अथवा अन्याय निर्मूलन इ. हेतूंनी आलेले नाही. "महानगरीत असे हे जीवन आहे" या जीवनात स्त्रीला कोणते जीवन भोगावे लागते याचे दर्शन पाध्यांनी आपल्या "चलोना वाली", "तेरीभी चूप मेरीभी चूप" या कथातून सहजतेने घडवलेले आहे.

७) अविवाहित मुलींचे जीवन संपूर्ण तपशीलांसह चित्रण करणाऱ्या साहित्याचे विरळपण सहज लक्षात येण्यासारखे आहे. या अविवाहिताच्या भावविश्वातील ताण-तणाव हे नैसर्गिकरित्या पाध्यांनी आपल्या "डॉक्टर कुमारी", "खाडलेली", "कुमारी मोहना धारप" या कथातून चित्रित केलेले आहेत.

८) पाध्यांच्या लेखनात वेगवेगळ्या समाजजीवनाचे स्तर येतात, ते चाळीतल्या माणसाचे दर्शन जसे वास्तवपूर्ण घडवतात तसेच मुंबईतील कामगार जीवनाचे चित्रणही ते आपल्या कथांतून करतात. या कामगारांच्या चळवळी, यातील नेतेगीरी, भांडणं, मारामाऱ्या यांचे वास्तव व यथार्थ चित्रण "एक सुन्हेरा ख्वाब" सारख्या कथेत पाध्ये करतात.

९) "स्वदेशभक्त काका", "देश पुढे गेला" सारख्या पाध्यांच्या कथा राजकीय वास्तव वाचकांसमोर ठेवतात. यातून पाध्यांच्या राजकीय, आर्थिक प्रणालीकडे पहाण्याच्या दृष्टीचा प्रत्यय येतो. या विविध प्रकारची आशय सूत्रे पाध्यांच्या कथेत सापडतात. यावरून असे दिसते, की पाध्यांच्या कथेतील तपशीलांना घटनांइतकेच महत्त्व असते. फक्त घटनांच्या चौकटीत त्यांच्या कथेचा आशय अभिव्यक्त होत नाही. त्यासाठी तपशीलांचे बारकावे लक्षात घ्यावे लागतात. किंबहुना तपशील हेच त्यांच्या कथेचे महत्त्वाचे सामर्थ्यस्थल असल्याचे प्रत्ययाला येते. हे तपशील पाध्ये बटबटीत स्वरूपात कथेत पसरत नाहीत. कथेत येणाऱ्या तपशीलांची एक आंतरिक संरचना असते. ही संरचना कथेचा आशय पेलत असते. आशयाला ठसठसीत रूप देत असते.

पाध्यांची लेखक म्हणून असणारी व्यापक सहानुभावाची मानवतावादी भूमिका स्पष्ट करण्यासाठी त्यांच्या कथांची आशयसूत्रे उपयोगी पडतात. लैंगिक संबंधाकडे ते निर्मळपणे नैसर्गिक व्यवहार म्हणून पहातात. हे तर समग्र मराठी कथेत नवखे वाटणारे त्यांचे वैशिष्टय आहे.

पाध्ये जगण्यातील सच्चेपणाला, अंत:प्रेरणांना अधिक महत्त्वाचे मानतात. हे त्यांच्या "अक्करमाशा", "नवरा", "संकेत मिलनाचा" इत्यादी कथांतून स्पष्ट होते.

स्त्री आणि तिचे भावविश्व यांचा पाध्ये अत्यंत आत्मीयतेने विचार करतात. त्यांच्यावर होणारे अन्याय, वाटयाला येणारी दु:खे यांचे वास्तवचित्रण करून वाचकाला अस्वस्थ करतात.

त्यांची प्रत्येक कथा त्यांच्या तटस्थपणाची साक्ष देते. पाध्ये कथाविषयाकडे जीवन व्यवहाराकडे तटस्थपणे पहातात. त्यांचे लेखन वास्तव व कलात्मक होते.

पाध्यांची अनेक लेखन वैशिष्टये त्यांच्या आशयसूत्रातून स्पष्ट होतात. याचा सविस्तर विचार तिसऱ्या प्रकरणात आपण करणार आहोत.

...........

## प्रकरण दुसरे

### संदर्भ


"कादंबरी"

१) नेमाडे भालचंद्र : मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप (१९५०-७५) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८६, पृ. ४७.

२) पाध्ये भाऊ : "संकेत मिलनाचा" मुरगी, डिंपल पब्लिकेशन मुंबई, आवृत्ती पहिली १९८१, पृ.४२.

३) पाध्ये भाऊ : "पायतला बूट", थोडीसी जो पीली, सरस प्रकाशन, माणिकपूर, आ. पहिली, १९८६, पृ. ८५.

४) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृष्ठ ८७.

५) पाध्ये भाऊ : "बगीचा" एक सुन्हेरा ख्वाब, धारा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली १९८०, पृ. ५१.

६) पाध्ये भाऊ : "पासवर्ड" थोडीसी जो पीली, सरस प्रकाशन, माणिकपूर, आवृत्ती पहिली, १९८६, पृ. १०८.

७) पाध्ये भाऊ : "वसुंधारा" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई आवृत्ती पहिली, १९८१, पृ. ८१.

८) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ७८.

९) पाध्ये भाऊ : "थिएटर" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८१, पृ. १४२-१४३.

१०) पाध्ये भाऊ : "कुटुंब" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, मुंबई आवृत्ती पहिली, १९८४, पृ. १७.

११) तत्रैव : तत्रैव, पृ. २३.

१२) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. २५.

१३) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ३०.

१४) पाध्ये भाऊ : "फाईव्ह गार्डन" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८४, पृ. ८.

१५) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. १५.

१६) पाध्ये भाऊ : "मुरगी", मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८१, पृ. ८.

१७) तत्रैव : तत्रैव, पृ. २७.

१८) पाध्ये भाऊ : "नवरा" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८४, पृ. ९४.

१९) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ९८.

२०) पाध्ये भाऊ : "अक्कमाशा" एक सुन्हेरा ख्वाब,
धारा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली,
१९८१, पृ. ९९.

२१) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. १०४.

२२) पाध्ये भाऊ : "चलो ना वाली" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन,
मुंबई, आवृत्ती पहिली, १९८४,
पृ. ३६.

२३) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ३७.

२४) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ४०.

२५) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ४०.

२६) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ४५.

.....